म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : प्रा. वा.
दा. क्र. : १८३०

प्रा. वा.
१८३०

BVBK-0401830

९८३०
बा.वा
४।९।८५

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. ९८३० दिनांक ४।९।८५
विषय बा.वा क्र. . . . .

# दर्दी दर्यावर्दी

सुरेश
मथुरे


सुपर्ण प्रकाशन, पुणे

BVBK-0401830

सुपर्ण
प्रकाशन

कोलंबस / वास्को-द-गामा  मॅगेलन / फ्रॅन्सिस ड्रेक

# दर्दी दर्यावर्दी



दर्दी दर्यावर्दी

प्रथमावृत्ती
जून १९८५

© सौ. प्रतिमा मथुरे

प्रकाशक
सौ. सुनीता मिरासदार
सुपर्ण प्रकाशन
१५५२, चिमणबाग
सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मुद्रक
अजित शशिकांत देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ-मांडणी
चंद्रमोहन कुलकर्णी

किंमत रु. १४

कोलंबसाचे गर्वगीत
लिहिणाऱ्या
कवी कुसुमाग्रजांना...

# प्रस्तावना

या संग्रहातील सर्व लेख प्रथम 'किशोर' मासिकातून १९८१–८५ दरम्यान प्रसिद्ध झाले. या मासिकाचे निवृत्त कार्यकारी संपादक श्री. वसंत सबनीस, आजच्या कार्यकारी संपादिका सौ. ज्ञानदा नाईक, सहाय्यक संपादक श्री. मुकुंद बीचरे यांच्याशी झालेल्या चर्चेचा लेखन करताना उपयोग झाला.

ही लेखमाला तयार करताना 'जगाचे प्रवासी'– प्रा. श्रीपाद महादेव माटे, '– भुगोलावरील साहसी प्रवासी'– श्री. वि. आ. मोडक, Age of exploration, International Time, Life आणि Down the Ages, Monica Felton या पुस्तकांचा उपयोग झाला. पुस्तकापुस्तकात ज्या

माहितीत तफावत आढळली त्या ठिकाणी विशेष भर न देता दर्यावर्दी नजरे-समोर कसा उभा राहील याचे कल्पना--चित्रणातून चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. महत्त्व आहे ते त्यालाच. अखेर हे श्रेष्ठ दर्यावर्दीही आपल्या-सारखेच रक्ता-मांसांचे होते. किशोर वयातील मुलांना ही गोष्ट गोष्टीरूपांतून जाणवली की निश्चितच माहिती आणि भौगोलिक स्थाने ॲटलासमधून पाहण्याचा त्यांना छंद लागेल. त्यांची वाचनकक्षा समृद्ध होईल. तसे व्हावे.

सुरेश मथुरे

मथुरे बंगला,
गावदेवी मैदान रस्ता,
ठाणे– ४००६०२

## अनुक्रम

कोलंबस / १
वास्को-द-गामा / २३
मॅगेलन / ४३
फ्रॅन्सिस ड्रेक / ६९

म. ग्रं. सं. ठाणे, ........ शाखा.
दाखल क्रमांक
दा क्र. 9530 दिनांक 81८K5
विभाग बा. वा. क्र. ........

## ॥ कोलंबस ॥

अमेरिकेचा शोध प्रथम कोलंबसाने लावला, की या खंडाला ज्या संशोधकाच्या नावामुळे नाव प्राप्त झाले त्या दर्यावर्दी 'अमेरिगो व्हेसापुकसी' याने लावला हा इतिहासकारांच्या वादाचा विषय आहे. एवढे खरे की पंधराव्या शतकाच्या ज्या काळात ॲटलँटिक महासागरावर पाय ठेवण्यास खलाशी धजत नव्हते त्या काळात कोलंबसाने दूरवरचे पर्यटन हाती घेतले आणि ते तडीस नेले.

मार्को पोलोने इंडिया–चीन या देशांची वर्णने फार सुंदर तपशिलांसह केली होती. या वर्णनांचा कोलंबसाच्या मनावर खोलवर परिणाम झाला. त्यामुळे समुद्रावर संचार करून नवा प्रदेश शोधून काढावा असे त्याच्या मनाने घेतले. युरोप देशातील स्पेनपोर्तुगाल यांचे भौगोलिक स्थान लक्षात घेतले तर एक प्रथम जाणवू शकेल : उत्तरेच्या बाजूला बर्फमय प्रदेश असल्यामुळे या बाजूला कोलंबसाला जाता येत नव्हते. दक्षिणेच्या बाजूला आफ्रिका खंडाला वळसा घालून खाली जावे तर विषुववृत्ताच्या उष्णतेने जळून जाण्याच्या भीतीमुळे खलाशी येण्यास तयार नव्हते. पूर्वेला समुद्र नसल्यामुळे कोलंबसाच्या मनात पश्चिम दिशेने घर केले होते. तो मूळचा संशोधक वृत्तीचा, नव्या विचारांना आत्मसात करणारा असल्यामुळे 'पश्चिमेला जात राहिल्यास आपण पूर्वेकडे येऊ' या तत्त्वावर त्याचा विश्वास बसला होता.

त्याचा स्वभाव दृढ निश्चयी होता. एक गोष्ट त्याने मनाशी ठरवली की तो ती सहसा सोडत नसे. आपल्या पर्यटन मोहिमेला पोर्तुगालच्या राजाचा राजाश्रय मिळत नाही हे लक्षात येताच तो सरळ

स्पेनच्या दरबारी मदतीसाठी गेला आणि तिथे या मदतीसाठी त्याने सतरा वर्षे वाऱ्या केल्या.

पूर्वेकडे असणाऱ्या मसाल्याच्या बेटात आपण निश्चितच पोचू असा त्याचा आत्मविश्वास असला तरी तो पोहोचला मात्र पश्चिमेकडच्या आजच्या वेस्ट इंडिज बेटांजवळ. एकापाठोपाठ एक अशा चार चकरा याच भागात मारूनही अखेरपर्यंत तो धरून चालला की आपण पूर्वेकडील इंडिया या देशातच आलो आहो. अखेर स्पेनच्या दरबाराची त्याच्यावर खप्पामर्जी झाली आणि शेवटच्या सफरीत त्याला कैद करून आणले गेले.

त्याचे अखेरचे दिवस वाईट अवस्थेत गेले असे असले तरी त्याच्या पर्यटनाचे परिणाम इतर दर्यावर्दी लोकांवर होऊन नवे नवे संशोधक पुढे येऊ लागले. जगाच्या इतिहासात भूगोलाच्या कक्षा उजळवून टाकण्यात कोलंबसाचे स्थान वरचे आहे. म्हणूनच त्याने शोध अमेरिकेचा लावला की वेस्ट इंडिज वगैरे कॅरेबियन बेटांचा हा महत्त्वाचा मुद्दा नसून कोलंबसामुळे त्यावेळच्या जगाला युरोप-आशिया–आफ्रिका या खंडासारखेच एक नवे खंड आहे याचा तपास लागला. कोलंबसाच्या संदर्भात महत्त्वाची गोष्ट आहे ती हीच आहे की जग आहे त्याहून फार मोठे आहे याची जाणीव त्याने करून दिली आणि या जगाचा परिचय करून घेण्याची प्रवृत्ती निर्माण केली.

म्हणूनच त्याचा उल्लेख दर्यावर्दी लोकांचा दर्यावर्दी असा केला तर ते वावगे ठरणार नाही.

# गोष्ट कोलंबसाची

लाल लालबुंद चेहरा, निळे डोळे आणि काळीभोर दाढी असलेला तो माणूस कोलंबस होता. नुकताच त्याला ॲडमिरल– दर्यासारंग असा मानाचा किताब स्पेनच्या इझाबेला राणीने दिला होता. स्पेनच्या पोलोस बंदरातून दर्यासारंग कोलंबस तीन जहाजे हाकारून इंडियाच्या शोधात आज निघणार होता. इंडिया पूर्वेला आहे. 'पृथ्वीचा आकार गोल असल्यामुळे पश्चिमेला अ‍ॅटलांटिक महासागरावर नौकानयन केले की आपोआप आपण पूर्वेला इंडिया देशात जाऊ', हे दर्यासारंग कोलंबसचे मत सर्वांनी मान्य केले होते. पोलोस बंदरावर इझाबेला राणीची तीन जहाजे 'पिन्टा', 'नीना' आणि 'सांता मारीया' हलत डुलत लाटांवर उभी होती. स्पेनच्या देशाचा राष्ट्रध्वज प्रत्येक जहाजावर फडकत होता.

नवे जग शोधण्याच्या महत्वाकांक्षेने झपाटलेला कोलंबस एका बाजूला उभा राहून तिन्ही जहाजांवरती नेण्याच्या वस्तू स्वतःच्या देखरेखीखाली भरत होता. प्रथम गोड्या पाण्याची पिंपे भरण्यात आली. जहाजातील कोठारात धान्याच्या गोणी दबवण्यात आल्या. कोंबडी, बोकड, दोन चार इतर प्राणी, डुकरे.... नव्या प्रदेशातील राजाला भेट देण्यासाठी स्पेनची प्रसिद्ध दारू, केशराचे डबे... तलवारी–चिलखते... किती तरी वस्तु भरल्या जात होत्या. हाताखालच्या लोकांना तो हुकूम करीत होता. सर्व जहाजे गरजेच्या वस्तूंनी स्वयंपूर्ण होतील, याची दक्षता घेत होता. एखादे जहाज वादळात सापडून बुडाले तर? त्याच्या मनात विचार आला; त्या दुःखी विचारासरशी त्याची नजर बंदरावरच्या किनाऱ्यावरील उसळलेल्या गर्दीत उभ्या असलेल्या मरीयमवर गेली. त्याचे मन चरकले.

धावत धावत तो मरीयमकडे गेला. तिचा हात हातात घेऊन तो तिला म्हणाला, 'मरीयम, तुला मी काय आणू? मरीयम.... सांग. सोने... हिरे... मोती?'

आंधळ्या मरीयमने इकडे तिकडे हात चाचपून पाहिले आणि

कोलंबसाचा स्पर्श होताच त्याला घट्ट बिलगत ती त्याला म्हणाली, ‘ नव्या देशात तुला भाकरी मिळेल का रे ? ’

‘ भाकरी मिळेल का ? ’ कोलंबस तिचे शब्द पुन्हा उच्चारून तिला म्हणाला, ‘ अग मरीयम, नवा देश मी शोधला की राणी इझाबेलाला सोन्या-रुप्याच्या खाणी मिळतील. हिरे-माणके मिळतील. नवा प्रदेश मिळेल. प्रभू येशूच्या धर्मात नवे लोक सामील होतील. त्यांना सन्मार्गावर आणल्याचे पुण्य मिळेल... भाकरी काय घेऊन बसतेस मरियम ? तुला-मला राजवाडयात रहायला जागा मिळेल.... नव्या देशाचे गव्हर्नर म्हणून आपण तिथे जाऊ.... नवा देश.... नवे जग... ’

डोळे मिटून कोलंबस स्वप्न रंगवत होता. डोळ्यापुढे हिरव्या हिरव्या अफाट मैदानांनी भरलेला, गोड गोड फळांनी लदलेला, रंगीबेरंगी फुलांनी नटलेला, नवे पक्षी, नवे प्राणी असलेला आणि सोन्याच्या कणाकणांनी ज्या देशाची धूळ भरलेली आहे असा पूर्वेचा इंडीज प्रदेश त्याच्या डोळ्यांपुढे येत होता.

‘ मरीयम, मरीयम,’ कोलंबस तिला म्हणाला, ‘ आतापर्यंत तू मला भाकरी भरवत आलीस. आता यापुढे मी तुला भरवणार... ’ कोलंबसाने खिशातून जपून ठेवलेला एक जर्दाळू काढला आणि तो तिच्या तोंडात भरवणार तोच किनाऱ्यावर आरडाओरड सुरू झाली. लोकांची गर्दी हातवारे करीत आरडाओरड करीत होती. त्या गडबडीत जर्दाळू खाली पडला. कोलंबस काय झाले म्हणून जहाजाकडे धावला. आंधळी मरियम चाचपडत चाचपडत कोलंबसाने दिलेला जर्दाळू मिळतो का पाहू लागली. गर्दीचा लोंढा आपल्या खलाशी नातेवाईकांना हात करायला पुढे सरकला .... तिला तुडवून पुढे सरकला आणि एकच गदारोळ माजला ....

सूर्य क्षितिजावर मावळण्यासाठी लाललाल होऊन आला होता. संध्याकाळ व्हायला आली होती. समोरच्या जुन्या चर्चमधून घंटेचा ‘ आमेन ’ झाला. प्रार्थना संपल्या. नगारे, पिपाण्या वाजू लागल्या आणि दोरखंड

सोडून ती तिन्ही जहाजे संथपणे पाण्यातून किनाऱ्यापासून दूर दूर जाऊ लागली. बुडणाऱ्या लालभडक सूर्याच्या रोखाने जाऊ लागली.... कोलंबस जहाजाच्या कठड्यावरून अजूनही मरीयम दिसते का पहात होता. पण त्याला कल्पना कशी यावी की आंधळी, प्रेमळ, गरीब मरीयम गर्दीत सापडून मरण पावली होती.

तीन जहाजे सूर्यास्ताकडे आता झपाट्याने जाऊ लागली. फुगलेल्या पांढऱ्या शिडांनी सूर्याला दूर ढकलण्याचा प्रयत्न केला.... मग ती जहाजे सूर्याला पाण्यात खोल ढकलू लागली. सूर्य अर्धाअधिक ढकलला गेला. पाव झाला.... आदपाव. चंद्रकोरीसारखा दिसू लागला नि मग ती तीन जहाजे पिन्टा, नीना, सांता मारीया सूर्याला ओलांडून पूर्वेच्या प्रदेशातले नवे जग धुंडाळायला निघून गेली.... हळूहळू त्यांचे आकार बदकांएवढे झाले.... नंतर त्यांच्या जागी फक्त रक्तचंदनी चेंडू दिसू लागले.... तेही दिसेनासे झाले....

मैलभर दूर जहाजे थांबली. आता खलाशी किनाऱ्याकडे पुन्हा माघारी जाणार नाहीत याची कोलंबसाने खात्री केली आणि दुसऱ्या दिवशी ३ ऑगस्ट १४९२ ला भल्या पहाटे जहाजे पुन्हा पुढे चालू लागली. अखेर ३ ऑगस्टला निघा अशी राजाज्ञा होती

ज्या खलाशांचे नातेवाईक किनाऱ्यावर निरोप द्यायला आले होते ते आता घराकडे रडत रडत परतू लागले. संध्याकाळ झाली आणि मग तो पालोस बंदराचा किनारा एकदम रिकामा झाला. एका खडकाजवळ फक्त मरण पावलेली मरीयम एखाद्या पडक्या पुतळ्यासारखी उरली होती.

थंड वारा वहात होता आणि समुद्र आपला नेहमीप्रमाणे अवखळपणे खळखळाटत होता.

पिन्टा, नीना आणि सांता मारीया हळूहळू समुद्रातून आपला मार्ग आक्रमत होती. कधी पिन्टा पुढे जाई तर कधी मागे पडे. तिन्ही जहाजे आपल्यामधले अंतर फार न राखता जात होती. कोलंबसाने इतर कप्तानांना

तसे सांगूनही ठेवले होते. कारण पहिल्या दोन-तीन दिवसांत चाचे लोकांची धाड आपल्या जहाजावर पडण्याची शक्यता आहे हे तो जाणून होता. चाचे लोक जमिनीपासून फार दूर नाही पण थोडे लांब राहून लुटालूट करीत असत. त्यांचा हल्ला झालाच तर काय करायचे याचे शिक्षण कोलंबसाने खलाश्यांना देऊन ठेवले होते. चाच्यांच्या जहाजावरील मुख्य डोलकाठीवर एक गळफास असलेला दोरखंड फेकायचा आणि या दोरखंडाला सर्वांनी खेचत रहायचे. जहाज वाकडे होत होत पाण्यात उलटे होईपर्यंत खेचत रहायचे.... कोलंबस आपल्या नावाड्यांना सांगत होता. नावाड्यांच्या मनात या पर्यटनाबद्दल आस्था वाटायला हवी म्हणून तो त्यांना एकत्र करून कधी नव्या जगातल्या— आपण ज्या नव्या जगात जाणार आहोत तिथल्या सोन्याच्या मातीबद्दल लोभ उत्पन्न करीत होता; तर कधी राणी इझाबेलाने दिलेल्या खास स्पेन देशाच्या मद्याच्या बाटल्या बाहेर काढून तो जहाजावरील खलाशांमध्ये आपुलकी निर्माण करीत होता. त्यांचा उत्साह कायम ठेवत होता.

खलाशी निवडतानाही त्याने फार काळजी घेतली होती. सगळे स्पॅनिश खलाशी त्याने घेतलेच नव्हते. काही तुर्की, काही अरब, काही ग्रीक, हबशी, निग्रर, कधी काळी कुणी बंड करायला नको म्हणून त्याने काळजी घेतली होती. ग्रीको आणि मोरक्को हे दोन खलाशी त्याचे आवडते खलाशी होते. त्यांना घेऊन तो आपल्या लाकडी खोलीत नकाशे आणि होकायंत्र पहात बसत असे. आपण किती अंतर काटले हे फक्त या दोघांना कोलंबसाव्यतिरिक्त माहीत असे. ढग कुठले ? क्यूमीलस का निंबस— फक्त तिघांची चर्चा चाले.

पर्यटन सुरू होऊन दोन दिवस झाले होते. स्पेन देश बराच मागे पडला होता. आणि आता आकाशातले तारेही थोडे निराळे दिसू लागले आहेत असे त्याला वाटू लागले. सप्तर्षींचा नांगर तर आता आपल्या हाताला लागेल असे त्याला वाटू लागले. ध्रुवतारा दूरदूर दिसे. इतर नक्षत्रांचेही

त्याला असेच 'भास' होत होते. पश्चिमेच्या रोखाने आपण जात राहिलो तर पूर्वेला आपण नक्की पोहचू या मनातल्या विचारावर त्याचा फार भरवसा होता. केवळ याच गोष्टीमुळे त्याची आत्तापर्यंत लोकांनी टिंगल केली होती. त्याला वेडा म्हटले होते. फक्त एक मरीयम सोडली तर सर्वच जण त्याला वेडा म्हणत असत.

मरीयमच्या विचाराने, आठवणीने तो स्वतःच भांबावून गेला. बिचारी आंधळी आहे. आता ती घरी भाकरी करीत असेल. मासाचे कालवण शिजवत असेल. ही आपली घरी जाण्याची वेळ. झोपडीबाहेर हात चाचपत ती उभी रहायची आणि आपण आलो की 'जहाजांची मदत राणीने दिली का?' असा प्रश्न विचारायची. आंधळी असूनही किती आपलेपणाने ती आपल्या पर्यटनाच्या कामाबद्दल विचारपूस करीत असे....या समुद्रापलीकडे काय आहे? किती उत्सुकता आहे तिला? इतर डोळस लोकांना त्याबद्दल काही वाटतच नाही...डोळे असून आंधळे आहेत!

कोलंबस खारा वारा घेत कठड्याजवळ उभा होता, तेवढ्यात एक खलाशी तिथे आला. कोलंबस सरसावून उभा राहिला. सावधानपणे. खलाशी डोळे ओले करून आला होता. त्याला त्याच्या घरची आठवण येत होती. 'पोरीचे लग्न व्हायचे आहे. एक छोटा मुलगा अजून मोठा व्हायचा आहे. या प्रवासात आपण वादळात सापडलो तर? मेलो तर?' तो खलाशी म्हणत होता.

त्याच्या खांद्यावर हात ठेवून कोलंबस म्हणाला— 'अरे, आपण प्रभू येशूच्या धर्मप्रसारासाठी तर जातोय. परमेश्वराचे काम आपण करायला जातोय. तो परमेश्वर वादळ आले तर आपल्यासाठी धावून नाही का येणार?' असे सांगून कोलंबसाने छातीला, खांद्याला, कपाळाला हात लावला. मग त्याने आभाळाकडे नजर फिरवली. त्या खलाशाला दिलासा दिला नि तो म्हणाला, 'स्पेनमधून ध्रुवतारा ज्या जागी दिसतो तिथेच तो अजून उभा आहे. मित्रा, अजून आपण स्पेन देशाजवळ आहो....'

पाणावल्या डोळ्यांनी आलेल्या त्या खलाश्यांची कोलंबसाने समजूत काढली खरी. पण आता यापुढे खलाश्यांची अस्वस्थता वाढतच जाणार ही गोष्ट कोलंबसाने पूर्ण ओळखली. खलाशी राणीचे पगारी नोकर आहेत. त्यांना नवे जग शोधण्याची इच्छा–उत्सुकता नाही. मारून मुटकून ते आपल्याबरोबर आलेत या विचाराने कोलंबस थोडा खिन्न झाला. त्यालाही झोप येत नव्हती.

बाहेर गर्द काळोख पसरला होता. आकाश खच्चून नक्षत्रांनी भरलेले दिसत होते. सप् सप् सप् सप् पाणी कापले जात होते.

कोलंबसाने आपल्या दोन आवडत्या मित्रांना खोलीत बोलावले. ॲलेक्झांड्रियाचा ग्रीको आणि इस्तंबूलचा मोरक्को. मग ते आल्यावर तिघेही जण नकाशे उघडून अटलांटिक समुद्र किती मोठा आहे, आपण कुठल्या दिशेकडून निघालो वगैरे गोष्टी पाहू लागले. होकायंत्राची सुई कुठे वळतेय, अंतर— खरे अंतर किती कापले गेले....

खोलीतला कंदिल जहाजाच्या हेलकाव्यांसरशी इकडे तिकडे झोके खात होता.... त्याच्या त्या हेलकाव्यांसरशी भिंतीवरती पडणाऱ्या त्या तिघांच्या सावल्या विचित्रपणे मागे पुढे होत होत्या. खोलीच्या खिडक्या बंद केलेल्या होत्या. परंतु वाऱ्याने घों घों घों आवाज येत होता... तेवढ्यात बंदुकीचा आवाज झाला.

....खडबडून सर्व जहाज जागे झाले. वेळ रात्रीची. जमीन दिसल्याशिवाय बंदुकीचा आवाज करायचा नाही असे ठरले असताना हा आवाज कसा आला ? कोलंबस, ग्रीको, मोरक्को तिघेही धडपडत खाली आले. पाहतात तो काय नीना बोटीजवळ आणखी एक छोटी बोट थडकली आहे. सांता मारीया बरीच मागे पडली आहे. तिच्याही आसपास छोटी एकदोन जहाजे येताहेत.... जहाजावरील सर्व लोक भयभीत झालेत. चाचे.... चाचे.... सर्वचजण ओरडत सुटले.... धावपळ चालू झाली. तारांबळ....

'थांबा!' कोलंबस खणखणीत आवाजात आपल्या खलाश्यांना म्हणाला.... मग त्याने सर्वांना आपापली शस्त्रे आणावयाला सांगितले. नावाड्याजवळ जाऊन आपले जहाज नानी जहाजाजवळ नेण्याचा हुकूम केला.... ग्रीकोला गळफासाचा दोरखंड तयार करून आपल्या डोलकाठीवर जाण्यास सांगितले. तो स्वतः बोटीच्या कठड्याखाली लपून, दडून चाचे लोकांचा अंदाज घेऊ लागला. बंदुकीच्या फैरीने त्याने दोन चाचे टिपले.

....रात्रीच्या त्या काळोखातही त्याने पोर्तुगीझ चाचे आहेत हे ओळखले. स्पेनच्या इझाबेला राणीकडे येण्यापूर्वी कोलंबस पोर्तुगीझ जहाजावर काम करीत असे त्यामुळे त्याला या चाच्यांची माहिती होती. त्यांच्या बरोबरीने त्यानेही लुटालूट, मारामारी केली होती. ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी अशी गोष्ट होती. म्हणून कोलंबस तेवढा गांगरून गेला नाही. तो फक्त दबा धरून बसला. इतर खलाश्यांनाही त्याने तसेच करायला सांगितले. ग्रीको वरती जातो कधी, चाचे लोकांच्या डोलकाठीत आपला दोरखंड टाकतो कधी याकडे कोलंबस फक्त लक्ष ठेवून बसला आणि आपले जहाज नीना जहाजावळ आता आलंय हे पाहून त्याने मोरक्कोला खूण केली....

ग्रीकोने अलगद दोरखंडाचा गळफास चाचे लोकांच्या डोलकाठीवर फेकला. पण तेवढ्यात चाच्यांच्या जहाजातून एक जळता पलिता कोलंबसाच्या जहाजावर आला. धूमधाम सुरू झाली. काही चाचे आता नीना बोटीवर चढू लागले. चढणाऱ्यांना तलवारी, भाले खुपसून खाली ढकलले जात होते, बंदुकीचे बार दणाणत होते.... जहाजाचे काही भाग पेटत होते,.... तोच ग्रीकोने फेकलेला फास आवळला जाऊ लागला. कोलंबसाच्या इशाऱ्यासरशी पंचवीस- तीस खलाशी दोरखंडाला लोंबकळू लागले. चाच्यांचे छोटेसे जहाज तिरपे होत होत एकदम कलंडून गेले.

आपले एक जहाज पाण्यात कलंडलेले पाहून इतर दोन जहाजे विरुद्ध

दिशांना पळू लागली.... झपाझपा ही जहाजे दूर जात राहिली... पाण्यात पडलेल्या जहाजातून चोरलेला माल, खाण्याचे जिन्नस, कोंबड्या, बदके, गटांगळ्या खात बाहेर पडत होती. पण आता कोलंबसाची तीन जहाजे नीना, सांता मरीया आणि पिन्टा संथपणे आपल्या मार्गाला लागली होती. चाच्यांची आणखी काही जहाजेही आता दिसायला लागली. नंतर आलेली कुमक त्याच वेळी आली असती तर कदाचित चाच्यांनी कोलंबसच्या तीन जहाजांची लुटालूट केली असती. पण सुदैवाने तो या प्रकारातून सुटला होता. तिन्ही जहाजांवर आलबेलचा घोष होत होता...

....समोरचा काळोख हळूहळू विरळ होत होता. क्षितिजाकडून सूर्यबिंबाची लाल चकती वर येत होती. पाहता पाहता ही चकती मोठी झाली. एखादा चेंडू पाण्यात बुडवून ठेवावा आणि तो निसटून टुणकन उडी मारून वर यावा तशी ती चकती वर आली.... सर्वत्र प्रकाश फाकत गेला आणि खवलेदार ढगांवर माशांची चंदेरी लकाकी आली. सकाळ झाली. समुद्र निळा झाला आणि त्याचबरोबरच आकाशही निळे निळे, ठाक निळे झाले. सूर्याच्या किरणांनी लाटा चमकू लागल्या, सोनरंगात नहाल्या.... नव्या जीवनाचा सूर्योदय झाला....

चाचे लोकांच्या त्या भुरट्या हल्ल्यानंतर काही खलाशी गर्वाने छाती काढून चालू लागले तर काही पार मरगळून गेले. राणीची नोकरी आणि नव्या प्रदेशातील सोन्याच्या मातीचे आमिष म्हणून आपण या मोहिमेत आलो पण आता आपला जीव राहील की नाही अशी शंका त्यांना वाटू लागली. आज चाचे आले; उद्या वादळ तर परवा समजा नव्या जगातील देशावर पाय टाकला तरी त्या देशातील रानटी लोक आपल्याला जिवंत खाऊन तर टाकणार नाहीत ना या विचाराने बरेच खलाशी गांगरून गेले.

पण मनातले विचार बोलून दाखवण्याची ताकद कुणामधे नव्हती. समजा, कोलंबसला जमीन सापडली तर आपल्या हातचे घबाड जाईल;

शिवाय त्याची नाराजी झाली आणि राणी इझाबेलाकडे त्याने कागाळी केली तर देहांत प्रायश्चित्त आपल्या वाट्याला येईल.... म्हणून प्रत्येकजण तोंड दाबून बसला होता. मांजराच्या गळ्यात घंटा कुणी बांधायची ?

दिवसामागून दिवस नि रात्रीमागून रात्री जात होत्या. लख्ख उन्हाची दुपार येई... जाई. गर्द काळोखाची रात्र येई आणि जाई. धुके पडे.... विरघळून जाई. वारा जोराने सुटे, पुन्हा मलूल पडे.... सप् सप् सप् सप् सप् सप्.... जहाजे आपली पश्चिमेच्या रोखाने वेड्यासारखी पूर्वेला भेटायला जात होती. मळमळ यावी असा निळा रंग. डोक्यात तिडीक उठावी असा निळा रंग.

बोटीच्या लाकडी कट्ट्याला टेकून कोलंबस मोरक्को आणि ग्रीकोबरोबर काहीतरी चर्चा करीत होता. तोच स्वैपाकघरातला मुख्य खानसामा तिथे आला. दबत दबत त्याने खारवलेले मास संपत आल्याची बातमी दिली.

एव्हढी एक छोटीशी घटना. पण तिचा गोंगाट दुपारपर्यंत सर्व जहाजभर पसरत गेला— ' मास संपत आलेय ', ' मास संपत आलेय.... जहाजावर आपापली कामे करतानाही खलाशी चर्चा करीत होते. मासाबद्दल मासे अधिक खाण्याचा कोलंबसाचा हुकूम आला तेव्हा तर सर्वचजण मनातून थरारले. आता यापुढे धान्य संपणार, मग कधीतरी गोडे पाणी.... नंतर उपासमार.... मधेच वादळ आले तर ?—

—एक बुटका, कानावर केस असलेला खलाशी असे काही इतर खलाशांना म्हणायला आणि एकाएकी आकाशात वीज कडाडायला एकच गाठ पडली. बघता बघता दुपार काळवंडून गेली. काळेकभिन्न हत्तीच्या आकाराचे गलेलठ्ठ मेघ गर्दी करून पश्चिम क्षितिजावरून पूर्वेकडे झपाट्याने चाल करून येऊ लागले. सुसाट वारा सुटला आणि त्या वाऱ्याने शिडे फुगलेली तिन्ही जहाजे वेडीवाकडी होऊ लागली.... लाटा अजस्र, कधी दिसल्या नव्हत्या इतक्या प्रचंड मोठ्या, उंच होऊ लागल्या. आता या खवळलेल्या समुद्रातच आपल्याला जलसमाधी घ्यावी लागणार की काय

असे प्रत्येकाला वाटू लागले. विक्राळ रूप धारण करून झंझावात जहाजांना गुरफटून टाकत होता.

'मांस संपत आलेय' या भीतीने भेदरलेल्या लोकांचे तोंडचे पाणी आता या वादळाने पार पळवून लावले. प्रत्येकजण जहाजाच्या एखाद्या आडोशाआडून हळूच बाहेर पहात होता. आणि पर्वताएवढी समोर दिसणारी प्रचंड लाट जसजशी जवळ येत जाई तसतसा डोळे मिटून, ओठ आवळून जे हाताला लागेल ते घट्ट पकडून उभा रहात होता, जीव मुठीत धरून.

समोरच्या नीना जहाजाचे एक शीड प्रथमच चाचे लोकांच्या गोळीने फाटले होते. ते आता वाऱ्यावर अधिकाधिक टरकत जाऊ लागले. कोलंबस आपल्या जहाजावरून नीनाच्या जहाजाला सारखा खुणा करीत होता— 'वळवून घे मार्ग. तोंड वळवून घे.' पण प्रचंड लाटापुढे कुणाचेच काही चालत नव्हते. लाटा धडकत होत्या. फुटत होत्या. फुटून उठत होत्या....

आकाशाकडे तोंड करून सर्व खलाशी आता प्रभूची प्रार्थना करीत होते— 'देवा या वादळातून आम्हांला सोडव.' कोलंबसही त्यांच्यांत जाऊन उभा राहिला. त्यानेही आभाळाकडे तोंड केले. डोळे मिटले आणि हात वर करून तो आता, 'ओ फादर, गिव्ह अस अवर डेली ब्रेड...' म्हणणार तोच विजेचा एक लोळ कडाडकन तुटला आणि समोरच्या विस्तीर्ण जलाशयात दूर कुठे तरी पडला. पण तो पडताना इतका जवळ दिसला की सर्वांच्याच डोळ्यांपुढे अंधारी आली. ती वीज आपल्याच जहाजावर कोसळली आहे असाच क्षणभर भास झाला.

वीज पडून गेली आणि वादळ शांत झाले. हळूहळू वाराही मंद झाला. ढगातून सूर्य बाहेर आला. समुद्राच्या लाटाही कमी उंच होत होत नेहमी-सारख्या झाल्या. प्रार्थना म्हणणारे सर्व खलाशी पांगून गेले. आता कोलंबसाच्या आसपास कुणीही थांबले नाही. कोलंबस, ग्रीको आणि मोरक्को फक्त तिघे जागेवर उरले. वाळीत टाकल्यासारखे.

पोलोस बंदर सोडून सव्वा महिना–दीड महिना आता होत आला. त्या प्रचंड वादळानंतर बहुतेक खलाश्यांचे मनोधैर्य खचून गेले होते. असे वेड्यासारखे सतत किती काळ जात रहायचे ? या अथांग समुद्राला अंत नाही.... या अथांग निळ्या आकाशालाही अंत नाही. सगळा मूर्खांचा कारभार आहे... इतर खलाशी एकमेकाला सांगत होते. जो तो आपापल्या घराच्या, मुला–बाळांच्या आठवणी काढून कोलंबसाला आणि त्याच-बरोबर ग्रीको – मोरक्कोला त्यांच्यामागे शिव्या देत होता.

कोलंबसाविरुद्ध आता एक कटच शिजत होता. 'जहाजे मागे फिरवायला कोलंबस तयार नसेल तर त्याला गिरफदार करून हे काम करायला हवं. पण आपले प्राण वाचवायला हवेत... !' एक खलाशी पुढारी होऊन दहावीस खलाश्यांना सांगत होता. वातावरण तापत चालले होते.

'त्यापेक्षा आपण असे करू,' दुसरा एकजण म्हणाला, आणि वाक्य अर्धवट टाकून गप्प बसला. तिसऱ्याने 'काय करू या ?' असे त्याला विचारले. पण त्या सांगणाऱ्या खलाश्याने डोळ्याने खूण केली.

समोरून ग्रीको आणि मोरक्को येत होते. ते दोघे कोलंबसाच्या खोलीत गेले. नेहमीप्रमाणे विचारविनिमय करायला.

त्याबरोबर पुन्हा खलाशी, जहाजावर इतर कामे करणारे लोक सर्व एकत्र आले आणि त्या सर्वांची चर्चा सुरू झाली. प्रत्येकाचा सूर एकच होता—जमीन लागणार केव्हा ? जमीन दिसणार नसेल तर बंड करून परत फिरणे एवढेच आपल्या हातात आहे.

खलाश्यांप्रमाणे कोलंबस स्वतःही हवालदिल झाला होता. त्यालाही जमीन लागणार केव्हा हेच कळत नव्हते. ग्रीक नकाशेतज्ज्ञ टॉलेमी याने काढलेले जुने नकाशे तो वापरत होता. या नकाशांवरची अंतरे, जहाजांचा वेग वगैरे गोष्टी लक्षात घेतल्या तर आता दीड महिन्यानंतर जमीन लागायला हवी होती. परंतु जमीन लागण्याच्या खुणाही दिसत नव्हत्या—सागरपक्षी दिसायला हवे होते, ते दिसत नव्हते. तो ग्रीकोला त्याबद्दल काही

विचारतोय तोच दारावर हळू आवाजात थपडा, धडका बसतायत असे त्या तिघांना कळले.

श्रीकोने पुढे जाऊन दार उघडले. दार उघडून पाहतोय तो समोर जहाजातले सगळे खलाशी उभे. ते दातओठ चावत होते.

'काय पाहिजे तुम्हांला?' कोलंबसाने पुढे येऊन विचारले.

'जमीन, जमीन....' खलाशांनी गिल्ला गेला.

'थोडे दिवस थांबा' कोलंबस म्हणाला.

'किती दिवस?'

'थोडे दिवस.'

'जमीन दिसेल?'

'का नाही दिसणार?' कोलंबस त्या सर्व खलाशांच्या सरळ पुढे येऊन म्हणाला, 'का नाही दिसणार? जर जमिनीला सागराचा किनारा असतो तर सागराला जमिनीचा किनारा का असणार नाही?'

'ठीक आहे. थोडे दिवस आम्ही थांबतो.' लोक गेले तसा कोलंबस निंबस ढगांच्या ढिगाकडे पहात राहिला. किनाऱ्यावरचे ढग दिसत नव्हते. कोलंबसाने एक सुस्कारा टाकला.

पण दोन दिवसांनी या लोकांना परत तोंड द्यावेच लागेल. तेव्हा काय करायचे? तो केस उपटत वेड्यासारखा त्या जहाजाच्या उघड्या जागेत इकडे तिकडे हिंडत राहिला. जमीन आणायची कुठून....? जमीन न शोधता आपण परत फिरलो तर स्पेनमध्ये वधस्तंभावर जावे लागेल....परत फिरलो नाही तर या लोकांशी सामना देऊन त्यांचे कैदी बनून रहावे लागेल....

....वेळ रात्रीची होती. जहाजावर सर्वत्र निजानीज झालेली होती. तारे चमचमत होते. दूरदूर अरुंधती लुकलुकत होती....तारकापुंजाचे हे बेचांगळे त्याचे आवडते होते.

पण आज तो अस्वस्थ होता. जमीन, जमीन.... हातावर हात

आपटत, केस फिस्कारत– उपटत अस्वस्थपणे कोलंबस एकटाच येरझारा घालताना मध्येच जहाजावरच्या एका कोपऱ्यात स्तंभित होऊन थबकला ...या कोपऱ्यात पाण्याने कुजू लागलेले बोटीवरचे लाकडी सामान ठेवलेले होते... त्यातल्या फळ्या, वासे, जुन्या झालेल्या खुर्च्या–टेबले.... त्यातल्या फळ्या त्याने नीट पाहिल्या. त्याच्या डोक्यात एक कल्पना तरळून आली.

वेळ रात्रीची आहे. सर्वजण झोपेत आहेत. नीना आणि सांता मारीया जहाजे आपल्यामागून येतायत... त्याने मोरक्कोला आणि ग्रीकोला उठवले. त्यांच्या कानात काही तरी सांगितले आणि थोड्या थोड्या अंतराने त्या तिघांनी काही जाडजूड फळ्या खाली पाण्यात सोडून दिल्या....आपल्या जहाजाच्या नावाड्याला– हा त्याच्या गटातलाच माणूस होता–शिडाचा कोन बदलून वेग कमी करायला सांगितला.

मग मात्र ते तिघे–कोलंबस, ग्रीको आणि मोरक्को निश्चितपणे झोपून गेले. खलाशी लोक उद्या संध्याकाळपर्यंत थांबणार होते, नाही काही मिळाले तर जहाजे वळवावी लागणार होती. पण आता बहुतेक परतावे लागणार नव्हते.

तास– दीड तास झाला असेल नसेल तोच नीना जहाज वेगावेगाने, मंदवेगाने जाणाऱ्या जहाजापर्यंत आले. चार लोक त्यांच्या जहाजातील लोकांना कोलंबसाला उठवा म्हणत होते. लाकडाच्या फळ्या तरंगताना तिथे दिसतायेत... किनारा जवळ असावा...ते सांगत होते. सुसंस्कृत इंडीज देश जवळ आला असावा....

आता खलाश्यांमध्ये एकच जल्लोष उसळला, ‘ जमीन जवळ आलीय ! जमीन जवळ आलीय ! जमीन दिसणार ! ’

डोळे चोळत उठलेले ग्रीको–मोरक्को कोलंबसाकडे पाहून हळूच हसत होते. आजचे मरण उद्यावर ढकलले म्हणून कोलंबसही हसत होता आणि जमीन लागत नाही म्हणून विवंचनेत पडलेले आणि या भयाण निळ्या

आकाशाला, निळ्या पाण्याला कंटाळलेले, संत्रस्त झालेले आणि केवळ मरणच आपल्याला या समस्येतून मुक्ती देणार अशा विचाराने वेडेपिसे झालेले लोक आता थोडे ताजेतवाने झाले होते. फळ्या दिसल्या म्हणजे जहाजांची इथे वहिवाट आहे.

कोलंबस त्यांच्या डोळ्यापुढे नव्या समृद्ध प्रदेशातल्या सोन्याच्या मातीचे स्वप्न उभे करीत होता. 'परत मागे फिरायचे तरी वादळे आहेत, चाचे आहेत. सर्वच अनिश्चित आहे,' तो त्यांना म्हणाला. 'त्यापेक्षा या फळ्यांचा काडीचा आधार घेऊ या. जमीन लागणार, जमीन दिसणारच आहे आपल्याला... '

जमीन दिसणार असे नुसते म्हणून जमीन कशी दिसावी ? चार दिवस शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ आहे यावर कोलंबसने लोटले. पाचव्या दिवशी पुन्हा खलाश्यांच्या तोंडचे पाणी पळाले. समोर अफाट, अथांग पसरत गेलेला निळा विस्तीर्ण, सागर, वर ढगांनी भरलेले आकाश... फक्त एवढेच.... पाणी, पाणी, पाणी, पाणी आणि फक्त पाणीच.... चौफेर, वर खाली दश-दिशांना पाणी.... आकाशातून पावसाचे पाणी.... खालून लाटांचे वर उसळणारे पाणी. प्रत्येकजण जळजळीत नजरेने आता कोलंबसाकडे पहात होता.... तो त्यांच्यांत येऊन उभा राहिला की निघून जात होता... त्याच्या नावाने शिव्या घालत होता मनात.

तेवढ्यात ग्रीकोला दूरवर काही तरी काळे काळे तरंगताना दिसले. सर्वजण 'खडक असावा' म्हणू लागले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर थोडी तुकतुकी आली. पण कोलंबसाला हा खडक नाही हे निश्चित जाणवत होते. ज्या वेगाने हे काळे तरंगत येतेय त्या वेगाने गणित मांडले तर या खडकाला स्वतःचा वेग असावा हे तो जाणत होता. पण तो गप्प बसला. खलाश्यांमध्ये विश्वास यावा म्हणून त्याने छातीला, दोन्ही खांद्यांना, कपाळाला स्पर्श केला. गळ्यातल्या क्रॉसचे चुंबन घेतले तोच....

....खलाशांनी जाळे फेकून ती अजस्त्र वस्तू वर खेचली.

ते एक अजस्र कासव होते. सुसरीएवढे लांब पण पिंपाएवढे गोल. ' मरीयमला कासव फार आवडतं,' तो ग्रीकोला म्हणाला. तसे सर्वजण म्हणू लागले, ' आज आता आपण याची सागुती करूया '. कोलंबसाने होकार दिला. मद्याच्या अगदी ठेवणीतल्या बाटल्या काढल्या आणि जहाजावर एकच जल्लोष उसळला.... नाच गाणे.... दारुची धुंदी.... बरळणे...

सोललेल्या कासवाच्या रिकाम्या पाठीवरून कोलंबसला विचार सुचला. आता खरोखरच आपण जमिनीच्या जवळपास आलोय. कारण कासवासारखे अर्धजलचर प्राणी खोल समुद्रात राहू शकत नाहीत. हे मिळालेले कासव अजस्र होते. आपल्या देशात न सापडणारे. त्या अर्थी आपण अगदी नव्या मुलुखाजवळ आलो आहोत. हा इंडीया देश तरी असावा किंवा कॅथी म्हणजे चीन देशाचा भाग तरी असावा....

तो कासवाकडे पाहून विचार करीत होता. त्याला त्याची मरीयम आठवली. चार पैसे कर्ज काढून त्याने एक दिवस तिला हाताच्या पंजाएवढे कासव आणून दिले. किती आनंदली होती मरीयम त्या दिवशी ! केव्हा एकदा पुन्हा घरी जाऊन आपण मरीयमला सांगू की या समुद्रापलीकडे अजस्र कासवं आहेत— आग्यावेताळी कासवं आहेत. फिरावे का माघारी ?

—पण आता खलाशी मागे फिरायला तयार नव्हते. त्यांनाही आता जमिनीचा वास येऊ लागला होता. त्यांच्या मनातली स्वप्ने फुलू लागली होती. सोन्याची माती गोळा करण्यासाठी प्रत्येकजण पडशी, ट्रंका, घोपट्या यांची शोधाशोध करीत होता.

....तरीही समुद्र संपत नव्हता.

तेवढ्यात चार खलाशी दूरवर आकाश नीट निरखून पाहू लागले. डोळ्यांवर हात ठेवून ते लांबवर आकाशात पहात होते. तिथे पक्ष्यांचा एक थवा उडताना दिसत होता.... चार काळे ठिपके संथपणे अथांग आकाशात विरत जात होते.

आता आपण नक्कीच एखाद्या भूप्रदेशाजवळ आलोय. रात्री निश्चिंतपणे झोपता झोपता कोलंबस विचार करू लागला.... एकदोन दिवसांत आता जमीन लागणार. मग स्पेनच्या राणीचा झेंडा हातात घेऊन आपण खाली उतरणार.... तो स्वप्न रंगवत होता, तोच सांता मारीया बोटीच्या कप्तानाने बंदुकीचा बार आकाशात उडवला....

.... बंदुकीचा बार जमीन दिसल्यावर उडवायचा असे त्यांचे ठरले होते. पण आता सांता मारीयाच्या कप्तानाला—पिंझोला, जमीन सापडली. सर्व श्रेय त्याला गेले.... जहाजावर गजबजाट सुरू झाला. अजून पहाट झाली नव्हती. पण आता जहाजाच्या कट्ट्यावर खलाशी रांगेने उभे राहिले. उत्सुक, आतुर.

.... हळूहळू समोरचा किनारा जवळ येत होता. गर्द हिरवळीची पठारे, त्यापाठीमागे उंचच उंच होत गेलेल्या डोंगररांगा.... 'या डोंगरात रुप्याच्या खाणी आहेत. या मातीत सोन्याचे कण आहेत.... करा, मजा करा. माझ्या मित्रांनो, तुम्ही जिंकलात!'... कोलंबस म्हणाला, नि त्याने स्पेनच्या रोखाने पिंजऱ्यामधली कबुतरे बातमीसाठी सोडून दिली....

.... जहाज किनाऱ्याला येऊन थडकले. गर्द, नारळ- माडांसारखी परंतु फताडया पानांची झाडी किनाऱ्यावरच्या वाऱ्यावर हिसफिसत होती. त्यांचे स्वागत करीत होती....

स्पेनचा झेंडा हातात घेऊन कोलंबस खाली उतरला. प्रथम त्याने पायाखालच्या जमिनीचे लवून, बसून चुंबन घेतले आणि तो समोर उभ्या असलेल्या लोकांकडे गेला.

त्यांना पाहून ते लोक मागे हटले. एक दोन मिनिटे नव्या लोकांकडे पाहून सगळे पळून झाडीत लपून राहिले. थोडया वेळाने त्यांचा राजा पुढे आला. कोलंबसाला त्याने लवून नमस्कार केला. हसला. हा राजासुद्धा त्या लोकांसारखा नागडा उघडाच होता. कंबरेला फक्त खजुराचे फताडे पान बांधले होते. रक्तचंदनाच्या रंगाचा. तरतरीत. उंच.... गळयात मण्यांच्या माळा.

.... वर आकाशातून अनेक पक्षी उडत जात होते. किनाऱ्यावर अनेक वेताळ कासवे दगडादगडात दबून लपून राहिलेली दिसत होती. राजाच्या सांगण्यावरून चार नागड्या लोकांनी एक वेताळ कासव पकडून आणले. नंतर त्यांनी कचकन् भाले खुपसून त्या कासवाला ठार मारले. त्याच्या अंगातून उडणाऱ्या रक्ताच्या चिळकांडीत राजाने तोंड धरले. एक दोन फवारे त्याच्या तोंडात गेले असतील नसतील पण तो ताजातवाना झाला— हिसफिस, फुसफूस करीत त्यांच्या लोकांशी बोलला....

....ग्रीकोने कोलंबसाच्या कानात सांगितले की वेताळ कासवाचे रक्त अमृत आहे असेच हे लोक सांगतायत. मोरक्कोनेही या म्हणण्याला दुजोरा दिला.

' इतकेच ना ! ' कोलंबस त्यांना म्हणाला आणि त्याने एक कासव आणण्याची आज्ञा केली. ग्रीको–मोरक्कोने त्या तिथल्या रक्तचंदनी लोकांच्या मदतीने एक कासव आणले. कोलंबसाने ते काठीने उलटे केले. त्यासरशी तुरुतुरु पळणारे ते कासव एकदम गप्प होऊन गेले. हात पाय आत ओढून गप्प बसले.

कोलंबसाने आपली बंदूक वर उचलली, सगळे रक्तचंदनी लोक टकमक पाहू लागले. तोच बंदुकीचा दाणकन बार झाला. कासवाच्या पोटात गोळी घुसली. राजासह सर्व लोक मागे हटले पण दुसऱ्याक्षणी पाहताच तो काय ? कासवाच्या पोटातून रक्ताची धार उसळत फेसाळत कारंजासारखी वर येत होती. राजा आणि त्याची सर्वच माणसे आता त्या अमृतपानात रंगली. प्रत्येकजण ओंजळीने पाणी प्यावे तसे रक्त पीत होता....

रानटी राजाला आता हे लोक देवदूत आहेत असे वाटू लागले. या लोकांना जे काही हवे ते दया असा हुकूम त्याने काढला.

' जमीन, जमीन ' म्हणून टाहो फोडणारे खलाशी आता नव्या नव्या फळांवर, रुचकर मदयावर, मासावर आणि अनेक इतर आमीषांवर तुटून पडले. हा प्रदेश गर्द हिरवागार होता. तऱ्हेतऱ्हेच्या फुला-फळांनी, पक्ष्यांनी

प्राण्यांनी गच्च भरलेला होता. इथल्या नद्या स्वच्छ मधुर पाण्याच्या होत्या. लोक प्रेमळ होते. पण.... पण.... सोने मात्र मिळत नव्हते. सोन्याच्या खाणी कुठे आहेत ? विचारले तर हे लोक फक्त दूरच्या पर्वताकडे बोट दाखवत. तिथे गेले की उंचावरून एखाद्या नव्या बेटाकडे बोट दाखवत. बेटावर आले की परत पुन्हा कुठे तरी दूर.... नुसते वणवण भटकणे.

कोलंबस कंटाळला. पण त्याचे बहुतेक खलाशी या नव्या रक्तचंदनी लोकांच्या पाहुणचारात रंगले होते.

कोलंबसाला मरीयमची आठवण येत होती. केवळ तिने धीर दिला, खायला प्यायला घातले म्हणून आपण हे काम करू शकलो. नाहीतर कुठे तरी सुतारकाम करीत लाकडे तासत राहिलो असतो. एक दिवस स्पेनच्या इझाबेला राणीचा झेंडा आपण शोधून काढलेल्या नव्या भूमीवर रोवून तो परत निघाला....

परत घराकडे यायला आता खलाशी नाखूष होते. त्यांना ' बटाटे ' हे नवे पक्वान्न मिळाले होते. ' तंबाखू ' नावाचे एक तरतरी आणणारे आणि तोंडातून धूर काढू शकणारे नवे व्यसन मिळाले होते. खाण्यापिण्याची त्यांची चंगळ होती.

कोलंबस जे लोक येतील त्यांना बरोबर घेऊन आता परत मायभूमीला निघाला. आपल्याबरोबर त्याने अनेक रक्तचंदनी रंगाचे स्त्री–पुरुष घेतले, तंबाखू घेतली. बटाटे घेतले. अनेक नव्या वस्तू घेऊन ' आपण नव्या जगात गेलो ' याचा पुरावा पटेल ते ते घेतले. सोन्याची धूळही घेतली.

—दोन वेताळ कासवेही घेतली. एक राणी इझाबेलाला द्यायला व एक मोठे आपल्या लाडक्या मरीयमला.

जमिनीला अंत असतो, आकार असतो तसा सागरालाही अंत असतो हे सिद्ध करणारा कोलंबस परत येऊ लागला. त्याचे पर्यटन संपले होते. शोध लागला होता. त्याने नवे जग शोधले होते. पश्चिमेकडे जाता जाता

आपण पूर्वेकडे जातो या तत्त्वाचा त्याने शोध लावला होता. आता तो इझाबेला राणीच्या हातचे मान, सन्मान, किताब स्वीकारणार होता.

...तडक जहाजावरूनच तो घरी आला; पण आपली प्रेयसी मरण पावली आहे या वृत्तानेच तो हादरून गेला. आपण समुद्र जिंकला पण मरीयम गमावली. मग त्याला कशातच रस राहिला नाही. फक्त प्रवास, प्रवास आणि प्रवास. पुन्हा जहाज हाकारून तो समुद्रावर गेला. अनेक बेटे पायाखालून घातली. परंतु प्रत्येकवेळी त्याला फक्त त्या प्रदेशातली माणसे, निरनिराळ्या तंबाखू-बटाटे अशा वस्तू एवढेच घेऊन परतावे लागत होते. सोने-रूपे मिळालेच नव्हते.

राणी इझाबेला या गोष्टीमुळे रुष्ट होत होती. अनेक सरदार तिचे कान फुंकत होते. कोलंबसाने पूर्वेकडची फुटकळ चार-पाच बेटे शोधून काढली असेच हे सरदार म्हणत होते. सागरसफरीचा अवाढव्य खर्च करून याने स्पेन देशाला काय मिळवून दिले? अशा मतांमुळे एक दिवस इझाबेला राणीने त्याला हद्दपार करून टाकले. त्याचे सर्व किताब काढून घेतले. राजाश्रय गेला.

पुन्हा वाईट दिवस त्याच्या वाट्याला आले. आपण एवढा मोठा शोध लावला तरीही आपल्याला कोणीही मानीत नाहीत याचे त्याला आतापर्यंत वाईट वाटत होते. आता तर रोजच्या जेवणाचाही प्रश्न निर्माण होऊ लागला. तो अन्न अन्न करीत एकेका पावाच्या तुकड्यासाठी हातापाया पडू लागला. आपण काय शोधले याचा पाढा कुणाहीसमोर वाचू लागला. लोक त्याला 'पूर्वेला जाण्यासाठी पश्चिमेला जाणारा वेडा' असे म्हणू लागले.

भीक मागत मागत एक दिवस तो मरीयम, त्याची पहिली बायको रहात होती तिथे समुद्रकाठी आला. मरीयमप्रमाणे तोही आता आंधळा झाला होता. आंधळी असूनही मरीयम आपल्या तोंडात रोज घास घालायची. आज आपण नव्या जगाचा शोध लावूनही स्वतःच्या तोंडात एक घास घालू शकत नाही या विचारानेच केवळ तो इतका अस्वस्थ झाला. 'मरीयम,

मरीयम, मरीयम ' करीत तिथे झोपड्याझोपड्यांतून, आंधळ्यासारखा चाचपडत धडपडत चालत राहिला.

...त्याच्या ' मरीयम, मरीयम ' या सादेला फक्त ' यम, यम ' असा प्रतिसाद उमटत होता. आणि त्याने एकेकाळी जिंकलेला तो सागर उधाण येऊन खदखदाट करून हसत होता. अखेर दमून, मरणोन्मुख, भुकेकंगाल कोलंबसला समुद्राने आपल्या लाटांचे हात लांबवून जवळ ओढले आणि आपल्या छातीवर बागडणाऱ्या या लाडक्या लेकराला स्वतःच्या उदरात मानाचे स्थान दिले. त्याची मानहानी, विटंबना थांबवली.

❋ ❋

## ।। वास्को–द–गामा ।।

पोर्तुगीझ अंमल भारताच्या काही प्रदेशावर काल–परवापर्यंत होता. म्हणून वास्को-द-गामा या दर्यावर्दी खलाश्याचे नाव आपल्या परिचयाचे झाले आहे.

कोलंबसाच्या जलपर्यटणानंतर स्पेन देशाचा दरारा पोर्तुगाल देशाहून बराच वाढला होता. पोर्तुगाल देशाला ते सहन होणारे नव्हते. याचे मुख्य कारण असे की, पोर्तुगाल देशाला हेन्री-द-नॅव्हीगेटर सारखा सागर साहसांबद्दल अतीव आस्था असणारा राजा लाभलेला होता. याच राजाने पहिली शिक्षणसंस्था काढून नाविकांना पद्धतशीर शिक्षण देण्याची प्रथा सुरू केली होती. अद्ययावत माहितीचे नकाशे काढून घेतले होते. आणि वेग-वेध मापनाची अनेक यंत्रे तयार करवून घेतली होती.

पोर्तुगालच्या इमॅन्युएल जॉन राजाने स्पेनचा विजय हा पोर्तु-गालचा अपमान आहे असे मनात ठेवूनच पावले टाकायला सुरुवात केली. त्याने प्रथम अनेक पोर्तुगीझ धाडसी खलाशांना आफ्रिका खंडाला वळसा घालून पुढे जाण्यास प्रोत्साहन दिले. बार्थोलोम्यू डायस, वास्को-द-गामा आणि पेड्रो अल्वारीस कॅब्रो असे अनेक धाडसी दर्यावर्दी या प्रोत्साहनामुळे पुढे आले.

आफ्रिका खंडाला वळसा घालून अथांग सागरामध्ये पुढे कुठे जायचे ? कोठल्या देशाला पाय लागणार ही त्या काळची बिकट समस्या होती.

ही समस्या सोडवण्यासाठी वास्को-द-गामा हा खलाशी पुढे आला. त्याने आफ्रिका खंडाला वळसा घालून केप-ऑफ-गुड होप पासून आपली जहाजे पुढे हाकारली. आफ्रिकेच्या किनाऱ्या-किनाऱ्याने मोझँबिक-मोंबासा वगैरे बंदरात बस्तान ठाकते, नवीन दाणागोटा गलबतांवर चढवत आणि डागडुजी करीत तो पुढे निघाला. पुढे मिलिंद या बंदरात त्याला काही अरबी व्यापारी भारत नावाच्या देशाशी व्यापार करतायत याची खबर लागली. एका कच्छी व्यापाऱ्याचा वाटाड्या म्हणून उपयोग करून अखेर वास्को-द-गामाने भारताच्या कालिकत या केरळ राज्यातील बंदरामध्ये १४९७ साली पाय ठेवला.

पोर्तुगाल देशाला वास्को-द-गामाच्या जलपर्यटणामुळे एक नवा देश सापडला. ताबडतोब या देशाने अनेक खलाशांना भार-ताकडे रवाना केले आणि पद्धतशीरपणे व्यापार करण्याचा डाव टाकून वखारी नंतर उघडल्या, वसाहती स्थापन केल्या.

वास्को द-गामाच्या पावलामधून वसाहतीचे युरोपियन लोकांचे स्वप्न साकार झाले असेच म्हणायला हवे. कारण कोलंबसाने ज्या कॅरेबियन बेटांच्या समुदायात पाय ठेवले आणि अमेरिकेसारख्या एका नव्या अज्ञात खंडाचे ( चवथ्या सफरीने ) महाद्वार ठोठावले त्यापेक्षा वास्को-द-गामाचे यश फार मोठे होते. पल्ला बराच दूर-वरचा होता. कॅरेबियन बेटावरील रहिवाशी रानटी अवस्थेतील

होते. तर गामा ज्या भारत देशात आला तो देश सुसंस्कृत होता. साहजिकच व्यापाराच्या मिषाने या देशाशी संबंध वाढवावेत आणि पुढे या देशावर पोर्तुगालची सत्ता स्थापन करावी असे पोर्तुगालच्या राजाला वाटले. ते त्याचे स्वप्न थोडेफार साकारही झाले आणि भारताच्या अंगुळभर भूमीवर पाच-साडे पाचशे वर्षे पोर्तुगाल देशाचे साम्राज्य राहिले.

वास्को-द-गामाचे यश हे असे उत्तुंग होते. तो पहिलाच असा दर्यावर्दी ठरावा की जो मायभूमीला सुखरूप पोहोचला आणि आनंदाने उरलेले आयुष्य जगला. कोलंबसासारखे खडतर आयुष्य जसे त्याच्या वाट्याला आले नाही तसेच मॅगेलनचे अकाली मरणही त्याच्या नशिबी लिहिले नव्हते.

धार्मिक प्रवृत्तीच्या या साहस वीरापासून आफ्रिकन निग्रो गुलामांच्या व्यापाराला उधाण आले ही एक दुर्दैवाची गोष्ट म्हणायला हवी. काळ्या गुलामांचा व्यापार फार पूर्वीपासून चालत आलेला असला तरी गामाच्या समुद्र साहसानंतर हा एक वहि-वाटीचा मार्गच झाला.

पोर्तुगाल देशाचा वास्को-द-गामा हा एक फार मोठा राष्ट्रीय वीर ठरला गेला असल्यास नवल ते कसले. लुईस-वाझ डी कामोएस या पोर्तुगीझ कवीने आपल्या महाकाव्यात गामाच्या गाथेचे वर्णन केलेले आहे.

# गोष्ट वास्को-द-गामाची

पोर्तुगाल देशाच्या राजधानीचे म्हणजे लिस्बन शहराचे ते एक टोक होते. त्याच टोकावर खलाशी लोकांनी नौका-नयनाची शाळा बांधलेली होती. खरे म्हणजे ती शाळा नव्हतीच. तो एक भव्य प्रासाद होता. डोंगराचे उतरते चिंचोळे टोक समुद्रात घुसले होते. त्यावरच ही शाळा उर्फ भव्य प्रासाद खडा केलेला होता. सभोवती तीन बाजूला तुफान शुभ्र खवळलेला दर्या, डोक्यावर पोर्तुगालचे निळे-निळेशार आकाश आणि पाण्यात अनेक नौका-होडया-मचवे-तराफे-गलबते-जहाजे-पडाव डुलत होते....

दूरवर एक किल्लाही दिसत होता. त्या किल्ल्याजवळ जुनाट, ढासळण्याच्या मार्गावर असलेले १०० वर्षांपूर्वीचे म्हणजे १४०० सालातले चर्च उभे होते........ चर्चच्या रस्त्यावर दोन चार लोक चालले होते. एकमेकांशी बोलत बोलत ते चालले होते. तोच पाठीमागून तुताऱ्या-शिंगे-ड्रमचा आवाज ऐकू येऊ लागला. रस्त्यावरचे लोक बाजूला झाले. घाबरून दूर झाले....

शिंगे-तुताऱ्यांची मिरवणूक आता जवळ आलेली दिसली. रस्त्यावरचे लोक पाहू लागले.... दोरखंडांनी हातपाय बांधलेले काळे गुलाम, या गुलामांच्या उघडया पाठीवर चाबकाचे आसूड ओढणारे, तलवारी घेतलेले आणि शिरस्त्राण घातलेले पोर्तुगीज शिपाई आणि सर्वांत मागे घोडयावर मोठ्या दिमाखात बसलेला एक स्वारः लालबुंद चेहरा, भरदार मिशा, पुढे आलेली छाती आणि डोळ्यात दटावणारा धाक.

"हा वास्को-द-गामा बरं का!" एक माणूस दुसऱ्याला म्हणाला.

"म्हणजे हाच जाणार की काय हिंदुस्थान देश शोधायला?" दुसऱ्याने विचारले.

"जाणार! अरे शोधून काढणार म्हण! पोर्तुगाल देशाचा राजा जॉन-पाठीशी आहे त्याच्या आणि स्वतः गामा कसा आहे पहा...तो रुबाब बघ. त्या मिशा बघ!"

.. तेवढ्यात सूर्य मावळून गेला आणि समोरच्या नौकानयन शाळेजवळ गुलामांची मिरवणूक पोहचली. आता नौकानयन शाळेच्या आजूबाजूला पलिते, मशाली पेटलेल्या दिसल्या. तो संपूर्ण भाग प्रकाशमान केलेला दिसत होता. दस्तुरखुद्द जॉन राजा स्वतः आज शाळेत गेलेला असावा असा लोकांनी तर्क केला. म्हणजे आता वास्को-द-गामाला जॉन राजा स्वतः सूचना देत असणार, जायचे कसे? कुठे थांबायचे? कुठे नाही?

पोर्तुगीज खलाशांनी जगावर पोर्तुगाल देशाचा झेंडा फडकवावा, अनेक नवे नवे देश पादाक्रांत करावे असे त्याचे स्वप्न होते. पण पोप महाराजांनी जगाची फाळणी करून जलपर्यटन कुठे करायचे–पोर्तुगालने कुठे आणि स्पेन देशाने कुठे हे ठरवून त्याबद्दलचे फर्मान काढले होते. त्यामुळे जॉन राजा चिडला होता. संतापला होता.

....नौकानयन शाळेच्या भव्य दिवाणखान्यात जॉनराजे वास्को-द-गामाची वाट पहात होते. दिवाणखान्यात ठिकठिकाणी भिंतीवर नकाशे लावलेले होते. हॉलंडमधून खास आणलेली शिसवीची मोठी मोठी कपाटे होती. अरबस्तान-पर्शियामधून आणलेले गालिचे, काचेची झुंबरे, या झुंबरात पेटवलेल्या मेणबत्त्या...एका कोपऱ्यात वाळूचे घड्याळही होते. या वाळूच्या घड्याळाकडे पहात राजेसाहेब बसले होते. त्यांच्यासमोर हेन्री-द नॅव्हीगेटर म्हणजे त्यांच्या पिताजींचेच एक भलेमोठे काढलेले चित्र होते...

...तोच टॉक-टॉक-टॉक आवाज झाला आणि भरदार छातीचा वास्को-द-गामा आत आला. त्याने अगदी लवून मुजरा केला ‘ आणि काय हुकूम ’ अशा अविर्भावात तो स्तब्ध उभा राहिला.

बराच वेळ जॉन राजा नकाशावरील हिंदुस्थान देशाकडे पहात होता. मग एकदम भानावर येऊन तो म्हणाला, “ तर तू तयार आहेस आफ्रिकेला वळसा घालून हिंदुस्थान देशात जायला ? ”

“ अलबत ! ! मी तयार आहे, ” गामा म्हणाला.

“ वळसा घालून जावे लागेल आफ्रिकेला. आहेस तयार ? ” जॉन

राजाने पुन्हा एकदा खात्री करून घेण्यासाठी त्याला विचारले.

गामाने मान हलवली. पुन्हा लवून मुजरा केला आणि म्हटले, " मी हिंदुस्थानच्या भूमीवर माझा पाय ठेवीन आणि मगच तुम्हांला तोंड दाखवीन ! "

वास्को-द-गामाचे ते शब्द ऐकून जॉन राजा त्याच्याजवळ आला, त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, " तुझ्याकडून मी हीच अपेक्षा करीत होतो. हिंदुस्थान देश कुठे आहे ते प्रथम शोधायचे. मग त्या देशाशी व्यापार सुरू करायचा आणि नंतर त्या देशावर पोर्तुगालचा झेंडा फडकवायचा."

" अरे कोण आहे रे आत ? " असे म्हणून राजाने हातातली शिसवी काठी आपटली. एक नोकर बाहेर आला. राजाने त्याला खूण केली. त्यासरशी तो नोकर झटकन आत गेला आणि डोळ्याचे पाते लवते न लवते तोच पुन्हा कबुतरांचे पिंजरे घेऊन बाहेर आला.

वास्को-द-गामा त्या शंभर कबुतरांकडे पाहात राहिला. राखी-कबरे-पांढरे पंख असलेले ते पक्षी पिंजऱ्यात कोंडून ठेवल्यामुळे नुसता फडफडाट करीत होते. एका क्षणात गामाचे डोके दुखायला लागले. त्याने कपाळाकडे हात नेला. पण जॉन राजा हसत होता...

थोड्या वेळाने तो गामाला म्हणाला, " ही सर्व शिकवलेली कबुतरे आहेत. ज्या ज्या बंदरात तू थांबशील त्या त्या बंदरातून एकेक कबुतर आकाशात सोड. त्याच्या गळ्यात लिफाफा बांध... आम्ही तुझ्या पर्यटनाचा नकाशा काढणार आहोत. नौकानयन हे शास्त्र आहे आणि नकाशा हा या शास्त्राचा डोळा आहे... "

हात वर करून राजाने खूण केली. नोकर कबुतरांचे पिंजरे उचलून निघून गेला. राजाने हातातली काठी दोन वेळा आपटली. पुन्हा नोकर बाहेर आला. आणि राजाच्या डोळ्याकडे पाहूनच आत गेला. आता त्याने दोरखंडाने बांधलेल्या एका अरब माणसाला खेचत बाहेर आणले.

वास्को-द-गामा या अरबाकडे पहात राहिला. त्या अरबाच्या हाताचे पंजे कापून टाकलेले होते. बिचारा अत्यंत केविलवाणेपणाने, जवळजवळ रडवेला होऊन पहात होता. बोटे नसलेले हात आकाशाकडे पसरत होता.

गामाकडे पहात जॉन राजा म्हणाला, " हा अरब तुला वाट दाखवील. याला नेटीव्ह लोकांच्या बऱ्याच भाषा येतात.... ज्या क्षणी हा तुझ्याशी दगलबाजी करील त्या क्षणी— "

" याला ठार मारायचे ! " गामा पटकन् म्हणाला.

पण जॉन राजाने नकारार्थी मान हलवली आणि आपली तलवार उपसून तो म्हणाला, " त्याचे फक्त पाय छाटायचे." मग त्या अरबाला धक्के मारत राजा नोकराला म्हणाला, " लेव्हे ओ कॅव्हालो पॅरा एस्ट्रे-बारीया ! " म्हणजे " जा, याला घोड्याच्या तबेल्यात नेऊन बांध पाहू."

दीनवाणेपणाने बाहेर जाणाऱ्या त्या थोटया अरबाकडे वास्को-द-गामा पहात राहिला. तेव्हा जॉन राजा त्याला म्हणाला " जर जगावर पोर्तुगीज झेंडा फडकावा असे तुला वाटत असेल तर तुला सैतान बनावे लागेल."

आता दिवाणखान्यातल्या खिडकीजवळ जात जॉन राजाने शिसवी काठीने समोर उभी असलेली गलबते गामाला दाखवली. " ते गॅब्रिएल जहाज.... " राजा वास्को-द-गामाला म्हणाला " आणि ते राफेल.... शिवाय ती दोन जहाजे.... "

काहीतरी आठवून राजाने आपली शिसवी काठी टेबलावर तीन वेळा आपटली. नोकर बाहेर आला आणि राजाच्या हिरव्यागार डोळ्यांकडे पाहूनच पुन्हा आत गेला. एक यादी घेऊन आता तो बाहेर आला.

" वाच " राजा मोठ्याने त्या नोकराला म्हणाला आणि वास्कोला म्हणाला " ऐक, तुझ्या जलपर्यटणाची ही यादी आहे."

नोकर भीत भीत कापऱ्या आवाजात वाचू लागला:

८०० पौंड खारवलेले मासे
३००० पौंड डुकराचे मास

१५००० बिस्किटे
२०००० पाव
३० बुशेल ओट
१०५०० गॅलन बियर
५०० पिंपे दारू
४००० गॅलन पाणी
१७५ खलाशी....

"थांब थांब," गामाने हात वर करून यादी वाचणाऱ्या नोकराला थांबवले आणि राजाला म्हटले, "रानेसाहेब, हिंदुस्थानच्या राजाला मी नजराणा काय द्यायचा ? त्याचे नाव यादीत नाही."

जॉन राजाने चकित होऊन गामाकडे पाहिले आणि म्हटले "नजराणा देण्यासाठी तू जात नाहीस, घेण्यासाठी जातो आहेस !"

"ते खरे आहे राजेसाहेब पण प्रथम–"

"प्रथम बंदुकीचा बार वाजव. हिंदुस्थानचा राजा पुढे आवाज करणार नाही. अरे आवाज करायला तो राजा काय स्पेन देशाची इझाबेला राणी आहे ?"

स्पेनच्या इझाबेला राणीचे नाव ऐकून वास्को-द-गामा चपापला. काही वर्षांपूर्वी त्याने जलपर्यटणासाठी या राणीकडे अर्ज केला होता आणि तिने हिंदुस्थान देशाचा मार्ग तू शोधलास तर मी तुला गडगंज संपत्ती देईन असे कळवले होते. पण ते मधेच बारगळले.

गामाने घाईघाईने मान तुकवून मुजरा केला. तोच दूरच्या जुनाट चर्चमधून प्रार्थनेची घंटा झाली. बुड्ढा पाद्री प्रार्थना सांगत होता. त्याचे शब्द स्पष्टपणे कानावर येत होते– 'रोगई पॉर नॉस. सान्ता माय दे देऊस पॅरा क्वे सेजामास डिगनॉस देस प्रॉमीसेस द क्रिस्टो आमेना !'

वास्को-द-गामा स्तब्ध उभा राहिला आणि प्रार्थना संपल्यावर त्याने दोन्ही खांदे-कपाळ-छाती यांना हात लावून क्रूसाची खूण केली. तेवढ्यात

त्याला काहीतरी आठवले. तो जॉन राजाला म्हणाला,

" महाराज क्षमा असावी. एक विचारतो."

" विचार विचार. बोल काय ?"

पण वास्को-द-गामा गप्प बसला. तसा जॉन राजा त्याच्याजवळ येऊन म्हणाला, " का थांबलास ? बोल !" असे म्हणून राजाने गळ्यातला मोत्याचा कंठा झर्कन बाहेर काढून वास्को-द-गामाच्या गळ्यात घालून म्हटले, " अरे बोल. काय म्हणतोयस ?"

चाचरत चाचरत वास्को-द-गामा म्हणाला, " महाराज, जलपर्यटणाला पोप महाराजांची परवानगी आहे ना ?"

वास्को-द-गामाचे ते शब्द ऐकून जॉन राजा ताडकन् इतक्या जोरात ओरडला–" राजा कोण आहे ? पोप की मी ?" असे म्हणून राजा निघून गेला.

...संथपणे गॅब्रियल आणि राफेल ही दोन जहाजे आपला लवाजमा घेऊन पोर्तुगाल देशाचा किनारा सोडून हिंदुस्थान देशाच्या शोधात, त्या देशाशी व्यापार चालू करण्यासाठी निघाली. गॅब्रिएल जहाजाचा कप्तान स्वतः वास्को-द-गामा होता आणि राफेल जहाजाचे हे पद गामाने आपल्या भावाला–पॉलला दिले होते.

दिवसामागून दिवस उलटत होते. जहाजे पाणी कापत होती. जहाजाच्या वरच्या डेकवरती येऊन वास्को-द-गामा एकटाच विचार करीत राही. जॉन राजाच्या खर्चाने आपण ही मोहीम काढली. आपण जावे म्हणून जॉन राजाच मागे लागला. जे जे आपल्याला हवे ते ते जॉन राजाने दिले. आता आपण हिंदुस्थान देशाला न जाता परत फिरलो तर ?

तर आपल्याला फासावर जावे लागेल. पण तो देश शोधला तर–तर मोठीच पंचाईत होणार. जॉन राजाला सत्ता हवी आहे आणि पोप महाराजांना येशू ख्रिस्ताच्या धर्माचे अनुयायी हवे आहेत. नेटीव्ह लोकांना ख्रिस्ती धर्माची शिकवण द्या आणि त्यांची मने अनुकूल करा, मने जिंका

असे पोप महाराज सांगताहेत तर तलवारीने रक्ताच्या चिळकांड्या उडवा असे राजसत्ता सांगते आहे...पोप मोठा की राजा ? राजा की पोप ?...कैक दिवस तोच संघर्ष त्याच्या डोक्यात चालला. कैक दिवस....पोप....राजा ....पोप....राजा...

तेवढ्यात खलाशांचा तांडा त्याच्या समोर उभा राहिला. जहाजावरचे हे खलाशी फार घाबरेघुबरे झाले होते. कारण आता त्यांची जहाजे विषुववृत्ताजवळ येऊन ठेपली होती आणि हे वृत्त ओलांडताना बहुतेक माणसे जळून खाक होतील, जहाजे जळून जातील असे त्यांना वाटत होते. त्यामुळे हे खलाशी कमालीचे घाबरून गेले होते. त्यांचे म्हणणे होते की इथे एखाद्या बंदरात प्रथम मुक्काम ठोकावा. पुढच्या हवामानाचा अंदाज घ्यावा आणि मगच पाऊल पुढे टाकावे. विषुववृत्तात जळण्यात काय अर्थ ?

....पण बंदरात मुक्काम करायला वास्को-द-गामा तयार नव्हता. आफ्रिकेच्या टोकाला म्हणजे आशास्पद भूशिराला– केप ऑफ गुड होपला वळसा घातल्याशिवाय बंदराचा आश्रय घ्यायचा नाही. इथपर्यंत तर वार्थोलोम्यूही आला होता.... आपला खरा प्रवास त्यापुढेच चालू होतो...

या गडबडीत विषुववृत्त केव्हाच मागे पडले. हवेत एकदम उष्मा जाणवून गेला. परंतु जहाजे जळाली नाहीत की, माणसे उकळून मेली नाहीत. समुद्र समुद्रच राहिला.

पण खलाशी पुन्हा घोळक्याघोळक्याने येऊन सांगत होते की एखाद्या बंदरात थांबू या आणि वास्को द-गामा बंदराचा आश्रय घ्यायला तयार नव्हता. त्याच्या मते आफ्रिकेच्या किनाऱ्यावरचे रानटी लोक आपल्या जहाजावर चढून आले तर ? या रानटी लोकांशी व्यापार तो कसला करणार ?

दिवस नाताळचे होते. सण असूनही एकही खलाशी आनंदी दिसत नव्हता. असे समुद्र धुंडत जात तरी किती दिवस रहायचे ? हिंदुस्थान

देश या दिशेला आहे की त्या? तो आहे तरी: का इथपासून खलाशांना शंका होती.

गॅब्रिएल आणि राफेल ही जहाजे समुद्रातून पुढे पुढेच जात होती. केप ऑफ गुड होपचे भूशिर मागे पडले. मग मात्र खंबीर मनाच्या वास्को-द-गामाला वाटू लागले आता जवळच्या बंदरात शिरावे. जहाजाची डागडुजी करावी. गोडे, प्यायचे पाणी भरून घ्यावे आणि जमल्यास हिंदुस्थान देशाचा कानोसा घ्यावा....... त्याने बंदरात शिरण्याचा हुकूम दिला.

... अडीच महिन्यांचा समुद्राचा वनवास काही काळ संपला म्हणून प्रत्येक खलाशी आनंदाने वागडत होता. त्या नवल्या प्रदेशाला नाताळ म्हणत होता.

बंदरात असे आपण थांबून राहिलो तर उभ्या आयुष्यात आपण हिंदुस्थानला पोहचणार नाही हे वास्को-द-गामाला जाणवत होते. पण कंटाळलेले खलाशी किनाऱ्यावर नव्हते. ते बंदराच्या आत दूर गेले होते...

...तीन-चार अर्धनग्न माणसे झाडावरचे मधाचे पोळे काढत होती. त्या लोकांनी मधमाशांच्या मोहोळाचा तुकडा तोंडात तर टाकलाच पण त्याबरोबर माशाही खाऊन टाकल्या. गामाचे लोक या आफ्रिकन हॉटेन हॉट नावाच्या जमातीच्या माणसांकडे पहातच राहिले. काही खलाशी 'मेल, मेल–मध, मध' असे बडबडत त्या लोकांकडे आशाळभूतपणे बघत बसले. खलाशी आणि काळे आफ्रिकन लोक यांची आता मारामारी सुरू झाली. काळ्या आफ्रिकन दणकट लोकांपुढे आपले काही चालत नाही असे पाहून खलाशी बोटीकडे धावत सुटले आणि त्यांच्या पाठीमागे तिरकमठा घेतलेले अर्धनग्न रानटी आफ्रिकन लोक लागले.....

...जहाजावर चढून वास्को-द-गामा हे सर्व पाहात होता. त्याने हवेत बार काढला... आणि या रानटी लोकांचे बाण जहाजावर येऊन

थडकण्यापूर्वीच नांगर उचलला... जहाजे चालू झाली...

पुन्हा गॅब्रिएल आणि राफेल जहाजे संथपणे आफ्रिकेच्या किनाऱ्या-किनाऱ्याने पाणी कापत जाऊ लागली. गामाला स्वतःलाच कळेनासे झाले होते की आफ्रिकेच्या कुठल्या बंदरात आपले स्वागत केले जाईल, व्यापारी वाटाघाटी करता येतील. हिंदुस्थान देशाचा रस्ता दाखवला जाईल... त्याने थोट्या अरबाला विचारले. पण तो अरबही आता नीट बोलेनासा झाला होता. ऊं ऽऽऽ हूंऽऽ ऽऽ ऊंऽऽऽ करून तो फक्त वेळ मारून नेत होता. अखेर चाबकाने पाठीवर दहा आसूड ओढल्यावर थोटा अरब म्हणाला– पुढे एक मालींदी नावाचे बंदर आहे. ते व्यापाराचे ठिकाण आहे. तिथला आफ्रिकन शेख राजा व्यापारी लोकांचे स्वागत करतो. परक्या व्यापाऱ्यांना सवलती देतो....

थोट्या अरबाचे म्हणणे खरे निघाले.

मालींदी बंदरात गॅब्रिएल-राफेल शिरल्याबरोबर आफ्रिकन काळ्या लोकांनी वास्को-द-गामाच्या गोऱ्या लालबुंद लोकांचे स्वागत केले. बंदरावर गडगंच माल भरून होता. इजिप्शियन कापसाच्या गासड्या, लवंगा, मिरे, दालचिनी, अरबस्तानातला खजूर, पर्शिया देशातली जाजमे, चीन देशातली मातीची भांडी.... गामाची नजर एकेका ढिगाऱ्यावरून फिरत होती.

"हा माल कुठे जातोय?" तो पोर्तुगीज भाषेत बडबडला. पण आजूबाजूचे काळे आफ्रिकन हबशी लोक त्याच्याकडे वेड्यासारखे पहात राहिले. त्यांना गामा काय म्हणतोय हे कळलेच नव्हते.

झटक्यात वास्को-द-गामाला थोट्या अरबाची आठवण आली. मग गामाचे सर्वच खलाशी थोटा अरब कुठे गेला याची शोधाशोध करू लागले. तो बोटीवर नव्हता. बंदरात दिसत नव्हता.

थोटा अरब माराला भिऊन पळून जाण्याचा प्रयत्न करीत होता. त्याने एका कच्छी व्यापाऱ्याला गाठले होते आणि आता त्या व्यापाऱ्याच्या

उंटावर बसून तो थोटा मालींदी बंदरातून अगदी आत पळून जाणार होता. पण तेवढ्यात एका खलाशाने त्याला उंटावर बसलेला पाहिला. खलाशाने गामाला दाखवून म्हटले–तो पहा थोटा पळून जातोय उंटावरून....

गामाने ताडकन् बंदुकीची गोळी झाडली. बंदुकीच्या बाराने संपूर्ण मालींदी बंदर धरणीकंपासारखे हादरले. गोळी उंटाला लागली आणि तो वाकडा–तिकडा वेडपटासारखा धावत सुटला. त्याच्या पाठीवरचा थोटा अरब आणि तो कच्छी व्यापारी उंटावरून खाली कोसळले. खलाशांनी त्या दोघांना पकडून नेले. आणि बंदुकीच्या गोळीने भेदरून गेलेले मालींदी बंदरावरचे आफ्रिकन हबशी लोक गामाच्या लालबुंद लोकांकडे पहातच राहिले. त्यांना वाटत होते की हे लोक आकाशातूनच खाली उतरले आहेत.

बोटीवर थोट्या अरबाला चाबकाचे चार फटके मारल्यावर थोट्या अरबाने आपण पळून गेल्याची कबुली दिली. गामाची नजर कच्छी व्यापाऱ्याकडे वळली. हा माणूस आफ्रिकन लोकांएवढा काळा आणि दणकट दिसत नव्हता. तो ठेंगू दिसत होता. या माणसाच्या कपाळावर लाल गोल जखम झालेली दिसत होती आणि या जखमेवर रक्त साकळलेले दिसत होते. वास्को-द-गामा पुढे झाला आणि त्याने त्या माणसाच्या कपाळावरचा लाल डाग पुसला. पाहतो तर कपाळ कोरडे ठणठणीत. जखम नाही नि काही नाही.

कच्छी माणूस रडताना हसला आणि म्हणाला, "ही काही जखम नाही. मी हिंदुस्थानी आहे. असे गंध आम्ही कपाळावर आंघोळ करून लावतो ".... त्याने अनेक प्रकारे हातवारे करीत सांगितले.

जहाजावरच्या एका खलाशाला कच्छी काय म्हणतोय ते कळले. तो गामाला म्हणाला, "टेरा इंडिया, टेरा इंडिया"–हा हिंदुस्थान देशाचा आहे.

"हिंदुस्थान देशाचा?" वास्को-द-गामा उडी मारून एकदम म्हणाला. मग त्याने त्या कच्छी वाटाड्याला मिठीच मारली. कच्छी वाटाड्याला

हिंदुस्थानचा मार्ग दाखवायला तयार आहे हे कळल्यावर तर गामाचा हर्ष गगनात मावेनासा झाला. त्याने खूण केली आणि सर्व खलाशी जहाजावर ' टेरा इंडिया, टेरा इंडिया ' करीत नाचू गाऊ लागले.

तेवढ्यात गामाला आठवले—जॉन राजेसाहेब म्हणाले होते की या थोट्याने दगलबाजी केली तर याला ठार मारू नको. त्याचे पाय तोड.

वास्को-द-गामा स्तब्ध उभा राहिला. त्याच्या कानात लिस्बन शहरातल्या जुनाट चर्चमधल्या बुढ्या पाद्र्याचे प्रार्थनेचे शब्द गुणगुणू लागले. ' रोगई पॉर नॉस. सान्ता माय दे देऊस. पॅरा क्वे सेजामास डिगनॉस देस प्रॉमीसेस द क्रिस्टो आमेन ! '

त्याने खांद्याला-कपाळाला-छातीला हात लावून क्रूसाची खूण केली. अरबाकडे नजर टाकली आणि डोळे मिटून त्याने मनातल्या मनात प्रार्थना केली.

प्रार्थना संपल्यावर वास्को-द-गामाच्या मनात आले आपण राजाचे नोकर आहोत. राजाला दाखवण्यासाठी या दगलबाज अरबाचे पाय छाटायला हवेत. त्याने एका क्षणात तलवार उपसून त्या थोट्या अरबाचे दोन्ही पाय छाटून टाकले. रक्ताचा सळकन ओघळ वाहू लागला.

कच्छी व्यापाऱ्याची बोबडी वळली. तो अक्षरशः थरथरत होता.... वास्को-द-गामाने त्याच्या खांद्यावर हात ठेवला आणि त्याला हळू आवाजात विचारले, " तुझ्या हिंदुस्थान देशाची दिशा कुठली ? "

घाबरत घाबरत कच्छी व्यापाऱ्याने उत्तर आणि पूर्व दिशेच्या मध्यावर हात केला आणि त्या ओघळणाऱ्या रक्ताच्या दृश्याने तो बेशुद्ध होऊन पडला.

.... संथपणे गॅब्रिएल आणि राफेल नौका आता हिंदुस्थानच्या दिशेने मार्ग कापू लागल्या ....

दिवसांमागून दिवस जात होते. रात्री उलटत होत्या. पण अजून हिंदुस्थानचा किनारा दृष्टीपथात येत नव्हता. खलाशी लोक पुन्हा बिथरू

लागले. हा कच्छी वाटाड्या दिशाभूल तर करीत नसेल ना? पाण्याचा साठा संपत आलाय....स्कर्व्हीची साथ खलाशी लोकांच्यामधे पसरत चाललेय....गव्हाचा आटा काळा पडलाय...

डेकवर उभे राहून वास्को-द-गामा एकटा दूरवर हिंदुस्थानच्या रोखाने पहात होता तोच उपकप्तान त्याच्या समोर आला. "एक सांगायचं होतं–" तो आदबीने म्हणाला.

"आपण बार्थोलोम्यूच्याही पुढे आलो आहोत," गामा उपकप्ताना-कडे न पाहता म्हणाला.

"होय साहेब, पण जहाजावर स्कर्व्ही...."

"अजून बरंच पुढे जायचं आहे. हा समुद्र नवा आहे. यावर पाय ठेवणारे पहिले युरोपियन आपणच."

"साहेब, जहाजावरचं पाणी संपत आलंय. खारं पाणी उकळून प्यावं लागतंय," उपकप्तान म्हणाला.

"हिंदुस्थान देशाला पाय लागलाच पाहिजे."

उपकप्तान काय बोलतो ते वास्को-द-गामा ऐकून घ्यायलाच तयार नव्हता. त्याचे सगळे लक्ष हिंदुस्थान देशाकडे लागले होते. आपला भाऊ पॉल आजारी आहे हेही त्याला आता जाणवत नव्हते. तेवढ्यात धावत धावत कच्छी व्यापारी वर आला आणि "किनारा दिसू लागलाय" असे सांगू लागला. तो हात दाखवून गामाला काहीतरी धुरकट दाखवत होता. क्षितिजावर दूरवर अस्पष्ट जांभळ्या-निळ्या डोंगर रांगा दिसायला लागल्या होत्या. थोड्या वेळाने नारळीच्या झाडांचा गर्द हिरवा पट्टा दिसू लागला. आणखी थोड्या वेळाने तर लाल तांबड्या मातीची जमीन, कौलारू घरांचे उतार, हिरवी-पोपटी रंगांचे शेताचे चौकोन....सगळेच आता स्पष्टपणे दिसू लागले. कच्छी व्यापारी 'कालीकत, कालीकत' करीत होता....

वास्को-द-गामाचे हृदय भरून आले. आज कैक वर्षे तो हिंदुस्थान देशाचे स्वप्न पहात होता. आज त्याचे स्वप्न त्याच्यासमोर हात जोडून

उभे राहिले होते. आनंदाने त्याने उडीच मारली आणि कच्छी व्यापाऱ्याला वर उचलून घेतले.

नंतर कच्छी व्यापाऱ्याकडून वास्को-द-गामाने कालीकत बंदराची माहिती करून घेतली. या भागाचा राजा झामोरीन कसा आहे ते काढून घेतले. किनाऱ्यावरून फेरफटका मारतानाच वास्को-द-गामाच्या लक्षात आले की हे लोक सुसंस्कृत आहेत. सरळ आहेत. यांच्या अंगात कपट-लबाडी नाही, शिस्तही नाही. ऐदीपणा आणि ऐषआराम यात वेळ दवड-णारे हे लोक आहेत. डोक्याला नारळाचे चपचपीत तेल चोपडायचे, अंगावर भस्माचे पट्टे ओढायचे, मंत्र म्हणत घंटा बडवत सुटायचे असा या माणसांचा खाक्या.

कच्छी व्यापाऱ्याला बरोबर घेऊन गामा बंदराबाहेर आला होता. सकाळ होत होती. तो एका जागी थांबला. बरेच लोक इथे घंटा बडवत होते. काही दाराबाहेर बसले होते. एका गोसाव्याकडे तो टक लावून पहात राहिला. जटा दाढी मिशा आणि अंगावर भस्माचे पट्टे लावलेल्या एका बसलेल्या गोसाव्याभोवती त्याने तीन चकरा मारल्या. . .प्रत्येक वेळी तोंडा-पुढे येऊन त्याने गोसाव्याकडे पाहिले.

कच्छी व्यापाऱ्याचे ऊर भरून आले. या गोऱ्या, सातासमुद्रापलीकडून आलेल्या साहेबालाही गोसाव्याभोवती प्रदक्षिणा घालाव्याशा वाटल्या याचाच कच्छी व्यापाऱ्याला आनंद झाला; पण तो क्षणभरच. कारण वास्को-द-गामाने त्याला विचारले, "या माकडाला शेपटी कशी दिसत नाही?"

. . . . तोच वास्को-द-गामाला राजाकडे म्हणजे झामोरीनकडे नेण्यासाठी राजाने पाठवलेला खास मेणा आला. मेण्यात बसण्याचा सर्वजण गामाला आग्रह करू लागले. पण गामा चकित होऊन त्या मेण्याकडे पहात राहिला. हा मेणा चालणार कसा? याला ओढायला घोडा कुठे आहे? निदान उंट? चाकेही नाहीत!

पण तेवढ्यात चार जणांनी बळेबळे वास्को-द-गामाला उचलून आत कोंबले. तो धडपडून बाहेर येणार तोच मेणा उचलून लोक चालूही लागले.

आता गामा झामोरीनच्या राजवाड्यात आला. इथे बसायला खुर्च्या नव्हत्या. टेबल नव्हते. लोक चबुतऱ्यावर आणि झामोरीन स्वतः रुईच्या कापसाच्या गादीवर लोळत होता. या राजाच्या डोक्यावर खारीच्या शेपटीसारखी केसांची शेपटी होती.

हिंदुस्थानी झामोरीन राजाचा तो दरबार पाहून वास्को-द-गामा आश्चर्यचकित झाला. राजाने गामाच्या खलाशी लोकांसमोर नारळ-काजू-फणस-केळी ठेवली होती आणि राजाचे लोक त्यांना हातांनी खूण करून 'खा, खा' असा आग्रह करीत होते. गामा भल्यामोठ्या खरखरीत फणसाकडे 'हे जनावर बिनावर तर नाहीना एखादे!' असा घाबरलेल्या दृष्टीने पहात होता होता. तेवढ्यात तो फणस कलता होऊन उपडा झाला.... तेव्हा तर गामा आणि त्याचे इतर खलाशी असे दचकले...

....सर्वच जण खदखदून हसायला लागले.

गामाने तिरक्या डोळ्यांनी सभोवार पाहिले. झामोरीन राजाच्या सभोवती अरब व्यापारी कडे करून होते. हे लोक आपल्याला फार त्रासदायक होणार. उद्या लढा द्यावा लागला तर तो याच लोकांशी द्यावा लागेल... हे गामाने धूर्तपणे ओळखले. अरब हसत होते आणि गामा मनात संतापत होता....

वास्को-द-गामाने दारूचा एक सुंदर चषक झामोरीन राजाला पोर्तुगाल राजाकडून भेट म्हणून दिला. राजा तो चषक उघडणार तोच एका अरबाने त्याच्या कानात काही तरी सांगितले. एकदम धावपळ सुरू झाली. झामोरीनच्या एका माणसाने एक मासा मडक्यातून आणला आणि तो मासा त्या चषकात सोडला. मासा एका क्षणात तडफडून मरून गेला.

.... झामोरीन राजा डोळे फाडून पहात राहिला. गामाच्या लोकांना

हाकलून-हुसकावून द्यावे असे दरबारातले लोक म्हणू लागले. पण कच्छी व्यापाऱ्याने मध्यस्थी केली आणि प्रकरण निभावून नेले. गामाच्या लोकांना व्यापारासाठी एक वखार घालण्याची परवानगी फक्त मिळाली.

झपाझपा वास्को-द-गामा जहाजावर परत आला. त्याने आता परत जाण्याचा निश्चय केला होता. आता इथे थांबण्यात अर्थ नव्हता. आपण हिंदुस्थान देशाचा मार्ग शोधून काढला. पोर्तुगालला परत जाऊन शंभर जहाजे घेऊन पुन्हा इथे यायचे आणि या खदाखदा हसणाऱ्या अरब लोकांचा काटा काढायचा असा बेत त्याने आखला.

'... मी शंभर जहाजे घेऊन इथे परत येणार आहे. पोर्तुगाल देशाचा झेंडा हिंदुस्थान देशावर फडकावा असे वाटत असेल तर या जहाजांची तयारी ठेवा...' त्याने जॉन राजाला चिठ्ठी लिहिली, लिफाफा बंद केला आणि एका कबुतराच्या गळ्यात तो अडकवणार तोच त्याच्या लक्षात आले की जॉन राजेसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे त्या बंदरातून प्रवास-मार्ग आक्रमताना आपण कबुतरे पाठवलीच नव्हती. ते काम करायला आपण विसरलो.

...निदान काळे हिंदुस्थानी पकडून आणायला हवे होते तेही विसरलो. हिंदुस्थानातून सोन्याची वाळू आणायला हवी तेही नाही. इथल्या खाणा-खुणा सांगता येतील अशा वस्तू... आपण काही काहीच बरोबर घेतल्या नव्हत्या. पोर्तुगालमध्ये परत गेल्यावर हिंदुस्थानला गेलो होतो यावर कोण विश्वास ठेवणार ?

पण आता गॅब्रिएल-राफेल यांनी हिंदुस्थानचा किनारा सोडला होता. आता जहाजे पुन्हा आफ्रिकेच्या रोखाने निघाली होती. हताश होऊन गामा डेकवरती एकटाच विचार करीत होता. एवढी मोहिम काढली पण—

कच्छी वाटाड्या त्याच्या जवळ येऊन त्याला दुरून येणारे एक जहाज दाखवू लागला. हे अरब जहाज आहे. परंतु हे व्यापारी जहाज नसून गरीब निरपराधी असे धार्मिक हिंदुस्थानी लोकांचे जहाज आहे. ... मक्का ...

काबा...वगैरे पवित्र ठिकाणे पाहून हे लोक येतात... बहुतेक लोक हिंदुस्थानात स्थायिक होणारे अरब जमातीचे असतात....तो म्हणाला.

... त्याचे ते शब्द ऐकून एकदम गामाच्या अंगात सैतान शिरला. याच लोकांना गिरफदार करून नेले तर...जॉन राजाच काय सर्वच पार्तुगीज लोकांना आपल्या पर्यटनाचा पुरावा मिळेल....

वास्को-द-गामाने हवेत खुणेचा बंदुकीचा बार उडवला. जवळ आलेल्या त्या प्रवासी जहाजावर गामाचे लोक तुटून पडले.अरबी यात्रेकरूंचे सर्व जहाज खाली करून त्या लोकांना गामाच्या लोकांनी आपल्या जहाजावर गामापुढे उभे केले. गामा त्या लोकांकडे पहात राहिला. घाबरेघुबरे झालेले लोक दयेसाठी हात पसरत होते. पोरे रडत होती. बायका किंचाळत होत्या....एकेक पाऊल पुढे टाकत गामा आपल्या खलाशांना म्हणाला, "जर आपल्या पितृभूमीचा झेंडा हिंदुस्थान देशावर फडकत रहायला हवा असेल तर या अरबांना ठार मारायला हवे. तरच झामोरीन राजाला मांडलिक बनवता येईल....प्रथम या लोकांमधल्या धडधाकट लोकांच्या पायात बेड्या घाला आणि त्यांच्या पायाजवळ अंगठा आणि अंगठ्याजवळचे मोठे बोट यात तलवारीने चीर पाडा. पाय बदकाच्या पायासारखे फाकले की ही माणसे पांगळी होतील. न्या यांना."

धावाधाव करीत खलाशांनी धट्टयाकट्टया अरबांना ओढून बाहेर काढले आणि गॅब्रिएल जहाजाच्या तळघरात धक्के मारून ढकलून दिले.

मग तो बायकांकडे पहात आपल्या खलाश्यांना म्हणाला, "या बायकांपैकी ज्या तरूण आहेत त्यांच्याशी तुम्ही लग्न करा. यांना होणारी मुले पोर्तुगीज रक्ताची व्हायला हवीत."

खलाशांनी एकच जल्लोष सुरू केला.

"थांबा!" वास्का-द-गामा कणखर आवाजात ओरडला, "ही लहान मुले निवडून त्यांना प्रथम दूर करा. या लहान मुलांना आपल्या धर्माची शिकवण द्या."

....नंतर उरलेल्या म्हाताऱ्या-कोताऱ्यांपासून अशक्त-रोगट माणसांकडे-बायकांकडे पहात तो म्हणाला, "या सर्वांना राफेल जहाजावर ठेवून द्या. रोज या लोकांपैकी जो सर्वांत वयोवृद्ध असेल त्याच्या मुसक्या बांधायच्या आणि सूर्य मावळताना त्याला समुद्रात फेकून द्यायचे....लक्षात घ्या हिंदुस्थान देशापासून आपल्या देशापर्यंतचा मार्ग रक्ताने रंगला तरच आपण या देशावर राज्य करण्यास लायक ठरू."

गामाचे बोलणे संपताक्षणीच खलाशांनी त्या यात्रेकरूंपैकी एका म्हाताऱ्याला खेचत पुढे आणले.

....सूर्य अस्ताला टेकला होता.

गामाला प्रार्थनेची आठवण झाली.

तो एकदम स्तब्ध राहिला. त्याने डोळे मिटून घेतले आणि लिस्बनमधल्या त्या जुनाट चर्चमध्ये म्हातारा बुड्ढा पाद्री म्हणत असे ती प्रार्थना सुरू केली.

प्रार्थना आटोपल्यावर त्याने समोर पाहिले. बेड्या घातलेला म्हातारा त्याला बुड्ढ्या पाद्रीसारखा वाटला. तो एक पाऊल मागे आला आणि कच्छी व्यापाऱ्याकडे बोट दाखवून म्हणाला, "आज याच्या मुसक्या बांधा. हा उद्या आपल्या शत्रूला हिंदुस्थान देशाची वाट दाखवेल...."

खलाशांनी डोळ्याचे पाते लवते न तोच त्या कच्छी वाटाड्याल पकडले. त्याच्या दोरीने मुसक्या बांधल्या आणि चेंडूप्रमाणे एकदम बुडणाऱ्या लालभडक सूर्याकडे भिरकावून दिले.

"...डुब' असा आवाज झाला आणि भगव्या-केशरी रंगाच्या त्या मावळणाऱ्या सूर्याबरोबर मुसक्या बांधलेले कच्छी व्यापाऱ्याचे ते गाठोडेही समुद्रतळाला गेले.

## ॥ मॅगेलन ॥

कोलंबसाच्या पर्यटणानंतर पाव शतक उलटल्यानंतर मॅगेलन या धाडसी सारंगाने पहिली पृथ्वीप्रदक्षिणा केली असती—

— असती असे म्हणण्याचे कारण असे की मॅगेलन घराकडे परतत असता एका बेटावरील रानटी लोकांकडून मारला गेला. या रानटी नरमांस भक्षकांनी त्याचे हात पाय तोडले असे म्हणतात.

कोलंबसाच्या अॅटलांटिक समुद्र सफरींचा परिणाम बऱ्याच खलाशांवरती झाला. प्रत्येक राजा त्या काळी मसाल्याची बेटे, सोने-रुप्याच्या खाणी या स्वप्नांनी झपाटलेला होता. नवे बेट मिळताच त्यावर वसाहती स्थापणे आणि धर्मप्रसार करणे हे दुय्यम हेतू प्रत्येक राजाच्या मनात होतेच. पोर्तुगीज नावाडी राजाच्या आश्रयाने आफ्रिका खंडाला वळसा घालण्यासाठी भीत भीत जाऊ लागले होते. भीत भीत हा शब्दप्रयोग अशासाठी की विषुववृत्ताच्या आसपास हवामान उष्ण असते याचा पडताळा अनेक खलाशांना आलेला होता. त्यामुळे येथून जाताना माणसे जळून जातात अशा वावड्या उठत होत्या. परंतु पोर्तुगीझ खलाशी विषुववृत्त

ओलांडून खाली गेले; इतकेच नव्हे तर वास्को-द-गामा या खलाशाने तर 'इंडिया' देशावर पाय ठेवला या बातमीने स्पेन देशात खळबळ माजली. याचा परिणाम असा झाला की मॅगेलन या खलाशाला स्पेन सरकारचा पर्यटनासाठी पाठिंबा मिळाला. गलबते, नावाडी आणि मोहिमेचा खर्च देण्याची तयारी दर्शवली गेली.

मॅगेलनने आपली जहाजे आजच्या दक्षिणअमेरिकेच्या किनाऱ्या-किनाऱ्याने हाकारली. अधेमधे लागणाऱ्या बंदरावरती मुक्काम करीत तो दक्षिण अमेरिकेच्या अगदी टोकाला असणाऱ्या चिंचोळ्या भागाजवळ आला. या ठिकाणी असणारी सामुद्रधुनी अत्यंत खडतरपणे पार करून तो प्रशांत ( पॅसिफिक ) महासागरात उतरला आणि पुढे मसाल्याच्या म्हणून प्रसिद्ध असलेल्या ईस्ट इंडिज बेटांपाशी आला.

या ठिकाणी मॅगेलनने एक थोडीशी चूक केली. त्याच्या अंगातला धर्मप्रसारक जागृत झाला आणि एका बेटावरच्या लोकांची बाजू घेऊन दुसऱ्या बेटावरच्या लोकांशी लढाई करण्यास तो उतावीळ झाला. याच लढाईत त्याला मृत्यू आला.

वास्तविक स्पेनच्या राजाने त्याला सामुद्रधुनीचा शोध घेण्यासाठी धाडले होते आणि ती त्याने शोधूनही काढली होती.

आपले काम करून तो तडक घराकडे परतला असता तर पहिल्या पृथ्वी प्रदक्षिणेचा मान त्याला लाभला असता.

पण तसे व्हायचे नव्हते.

असे जरी असले तरी दर्यावर्दी म्हणून त्याने लावलेले शोध फार मोठे आहेत. प्रथम म्हणजे त्यानेच प्रशांत महासागराचा शोध लावला. आत्तापर्यंत युरोपियन खलाशी या समुद्रापर्यंत आलेही नव्हते. दुसरे म्हणजे दक्षिण अमेरिकेच्या टोकाशी असणारी सामुद्रधुनी— तिला मॅगेलनचेच नाव देण्यात आलेले आहे. या सामुद्रधुनीमुळे त्याने फार मोठे अंतर कापणारी आणि वेळ वाचवणारी वाट शोधून काढली असे नव्हे. त्या काळी जहाजावरती अद्ययावत यंत्रसामग्री नसताना या सामुद्रधुनीचा उपयोग फार चांगला होत असे आणि आजही होतो. कारण या टोकाला वळसा घालून जाण्यासाठी ही सामुद्रधूनी हा एक भोज्याचा खांब आहे. तिथे न वळता पुढे चालू राहिले तर थेट दक्षिणध्रुवापर्यंत अथांग समुद्रच समुद्र पसरलेला असल्यामुळे हरवून बसण्याची शक्यता येते. आणि तिसरे म्हणजे कोलंबसाचे स्वप्न मॅगेलनने पुरे केले असे म्हणता येईल— पूर्वेकडे जाण्यासाठी पश्चिमेला प्रयाण करायला हवे. पृथ्वीचा आकार गोल असल्यामुळे आपण आपसुकपणे उगवत्या सूर्य किनारी येतो.

# गोष्ट मॅगेलनची

स्पेन देशातील सॅव्हेली राजवाड्याकडे ते दोन इसम घाईघाईने आणि अतिशय सावधपणाने चालले होते. या दोन इसमांपैकी एकजण अत्यंत वृद्ध दिसत होता. त्याच्या डोक्यावरचे केसही पिकून पार रुपेरी झाले होते आणि मात्र दुसरा चांगलाच धष्टपुष्ट, तरुण आणि अत्यंत महत्त्वाकांक्षी वाटत होता. तो होता पहिली पृथ्वी प्रदक्षिणा करणारा पोर्तुगीझ नावाडी आणि पॅसिफिक– प्रशांत महासागर शोधणारा शूर वीर–फर्डिनंड मॅगेलन.

चालता चालता वृद्ध माणसाने मॅगेलनचा हात थोडा ओढला आणि अदबीने तो हळूवारपणे म्हणाला, "कॅप्टन फर्डी, सासरा म्हणून वयाच्या अधिकाराने मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो. पोप आणि स्पेनचे राजेसाहेब या दोघांमधे एक करार झालाय. 'टॉरडेसिलाचा तह' या नावाने तो ओळखला जातो, तेवढा ध्यानात ठेवा."

इतक्यात ते दोघे राजवाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ आले. नंग्या तलवारी घेतलेल्या चारचार गस्त रक्षकांच्या जोड्या या दाराजवळ गस्त घालत होत्या. मॅगेलनने पुढे केलेले कागद या गस्तरक्षकांपैकी एकाने वाचले आणि तत्काळ हवेत बंदुकीची फैर झाडली. त्यासरशी आतून बॅन्डचे पथक रूट मार्च करीत बाहेर आले. या पथकाने पाहता पाहता दोन भाग केले. मॅगेलन आणि त्याचे सासरे यांना मध्यावर टेवून ते बॅन्डचे पथक बॅन्ड वाजवत आत जाऊ लागले....

मॅगेलन चकित होऊन गेला. आपण जन्माने पोर्तुगीज. अर्धी हयात पोर्तुगालच्या राजा-राणीच्या आरमारात दर्यावर्दी म्हणून घालवली... स्पेनचा राजा आपले इतके कौतुक का करीत असावा? याचा काय हेतू असावा?

विचार करीत करीत मॅगेलन एकेक पाऊल टाकत राहिला. सभोवतीचे राजवाड्याचे प्रशस्त उद्यान स्पेनच्या वैभवशाली राजवटीचे चित्र रेखाटत होते. मोठे सूचिपर्णी वृक्ष रस्त्याच्या दुतर्फा शिस्तशीर लावलेले दिसत होते. आणि अनेक कारंजी थुई थुई उंच उडत होती. सूर्याचे पिवळे किरण

या पाण्याच्या झोतावर पडून त्यातून हिरे-माणके-पाचू-मोती उडतायत असे वाटत होते.

विचार करता करता मॅगेलनच्या समोर त्याच्या देशाचा राजा उभा राहिला. आपल्या देशासाठी आणि या राजासाठी आपण जीव धोक्यात घालून पूर्व दिशेने लंका, मलाक्का वगैरे देशापर्यंत जाऊन मसाल्याच्या बेटांची माहिती आणली आणि नोकरीत बढतीची अपेक्षा केली तर कद्रु पोर्तुगीझ राजाने आपला दरबारात अपमान केला आणि इथे स्पेनचा राजा बैठकीसाठीही केवढा थाटमाट ठेवतोय.

....इतक्यात बॅन्ड थांबला.

मॅगेलन आणि त्याचा सासरा आता एका प्रशस्त कमानीसमोर उभे राहिले होते. समोरून दोन उंची पोषाखातले शिपाई आले. मॅगेलनला आणि त्याच्या सासऱ्याला त्या दोघांनी कडक सलाम ठोकला आणि वर चलण्याची खूण केली.

उंची पर्शियन जाजमावरून पावले टाकत ते दोघे वरच्या दिवाणखान्यात आले. हा दरबारी दिवाणखाना ऐश्वर्याने झगमगत होता. रंगीबेरंगी काचांची झुंबरे, मोठमोठे गुळगुळीत खांब, भिंतीवर हिंस्र श्वापदांच्या मुंडक्यांच्या रांगा, तलवारी, चिलखते, पृथ्वीगोलाचे नकाशे, शिसवीच्या तुकतुकीत टेबलावर मांडलेली फळे, निरनिराळ्या आकारांच्या मद्यांचे बुधले आणि चिनीमातीचे मिंगब्राऊल्स....वाडगे....बरण्या....

....पुन्हा बिगुलाचा आवाज झाला.

मॅगेलन ताठ उभा राहिला. बैठक सुरू होत होती.

पलीकडच्या व्हरांड्यांतून दस्तुरखुद्द स्पेनचे चार्ल्स राजेसाहेब येत होते. अनेक मंडळींचा लवाजमा त्यांच्या बरोबर येत होता. हे उमराव-सरदार लोक होते. राजेसाहेब स्वतः एका वृद्ध बिशपबरोबर गप्पाटप्पा मारत येत होते. वृद्ध बिशप तपकिरी डगला घालून हातात रोझरी जपत येत होते. राजेसाहेबांचा पायघोळ भर्जरी डगला कमालीचा मोठा होता. या डगल्याचा

मागचा बराच मोठा भाग पर्शियन गालीच्यावर जहाजाने पाण्यावर रेषा ओढावी तसा रेषा ओढत येत होता.

राजेसाहेब, बिशप आणि उमराव आता आपापल्या स्थानांवर बसले. कुणीतरी एका कोपऱ्यातून मॅगेलनच्या नावाचा पुकारा केला. मॅगेलन दबत दबतच, थोडा घाबरतच पुढे झाला. पृथ्वी प्रदक्षिणा करायला आपल्याला मिळणार की नाही या स्वप्नाचा आता निकाल लागणार होता. त्याबद्दलच्या त्याच्या अर्जाचा निर्णय लागणार होता.

मॅगेलन पुढे झाला तसा राजेसाहेबांनी त्याच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला आणि मंद स्मित केले. त्यांच्या डोक्यावरचा सोन्याचा मुकुट लकाकला.

"तू जन्माने पोर्तुगीज का?" करड्या आवाजात राजेसाहेब म्हणाले.

"होय. पण पोर्तुगालच्या राजाशी माझे भांडण...."

मॅगेलनला मधेच झटकन तोडून राजेसाहेब हात वर करून म्हणाले, "विचारीन तेवढेच सांगायचे. न विचारलेले स्पेनच्या राजाला माहीत असते असे समजायचे!"

मॅगेलन क्षणार्धात शरमिंदा झाला. तेवढ्यात हसत हसत राजेसाहेब म्हणाले, "तुझे कागदपत्र, मोहिमेचा आराखडा वगैरे आम्ही पाहिले. तुला पश्चिमेकडून पर्यटन करीत पूर्वेकडे पृथ्वीप्रदक्षिणा करायची आहे...."

"होय साहेब. कोलंबस म्हणायचा त्याप्रमाणे पश्चिमेकडून...." इतके म्हणून मॅगेलन मधेच थांबला.

"मला ते नकोय!" सिंहासनावर मान रेलून राजेसाहेब म्हणाले. ते थोडे अस्वस्थ झालेले दिसत होते.

"तुम्हाला जे हवे ते सांगा. हा एकनिष्ठ बंदा स्पेनच्या सेवेसाठी सर्वस्व अर्पण करायला तयार आहे," मॅगेलन शांतपणे म्हणाला.

राजेसाहेबांनी हात वर केला.

एका भालदाराने त्यांच्या हातात जवळ जवळ माणसाच्या उंचीइतकी लांब एक शिसवी काठी दिली. या काठीच्या टोकाला प्रकाशमान हिरा

बसवलेला होता. काठीचे टोक आता राजेसाहेबांनी सिंहासनामागे भिंतीवर लावलेल्या भल्या मोठ्या नकाशावर ठेवले. या नकाशावर २५ वर्षांपूर्वी कोलंबसाने केलेल्या सफरीचा मार्ग दाखवलेला होता. इतका तो नकाशा अद्ययावत होता.

कुतूहलाने मॅगेलन दोन पावले पुढे टाकत नकाशापर्यंत जाण्याचा विचार करतोय तोच पहिल्या पावलावरतीच काठी आडवी आणत राजे-साहेबांनी त्याला थांबवले.

"पेरडोअर, पेरडोअर–क्षमा करा महाराज" मॅगेलन एकदम मान खाली घालून म्हणाला.

"स्पेनच्या राजाने सांगितल्याशिवाय एक पाऊल कुणी पुढे टाकायचे नाही की टाकलेले पाऊल मागे घ्यायचे नाही" राजेसाहेब खणखणीत आवाजात म्हणाले.

मग स्वतःच उठून ते नकाशाच्या थोडे जवळ गेले. आता त्यांनी हातातल्या काठीचे दैदिप्यमान टोक त्या नकाशावरील स्पेनच्या भागावर ठेवले व आवाजात थोडे मार्दव-हळुवारपणा आणून ते म्हणाले, "सेनॉर मॅगेलन, आपण इथे स्पेनच्या सेव्हिला बंदरावर उभे आहोत. हा ॲटलांटिक महासागर. हा असा ओलांडून कोलंबस या वेस्ट इंडिज बेटांजवळ गेला. ही गोष्ट मोठी आहे. पण – –"

आपल्या इतर सहकाऱ्यांकडे नजर टाकत ते म्हणाले, "पण ही काही खरी मसाल्याची बेटे नाहीत. मसाल्याची बेटे आहेत पूर्वेकडे....इथे....या भागात."

"तेच मी म्हणतो!" मॅगेलन एकदम म्हणाला.

त्याच्याकडे दुर्लक्ष करीत राजेसाहेब म्हणाले, "खऱ्या मसाल्यांच्या या पूर्वेकडच्या बेटांवर पश्चिमेकडून जायला हवे."

"जाईन की! पृथ्वी गोल आहे" मॅगेलन म्हणाला. हे म्हणताना उत्साहाने तो पुढेच पाऊल टाकणार होता. पण त्याच्या सासरेबुवांनी

हळूच त्याचा हात मागे खेचला.

"पृथ्वी गोल आहे म्हणून नुसते जाता येईल असे मला नकोय. मला या विभागात एक सामुद्रधुनी शोधून हवी" राजेसाहेबांनी आता काठी सरकवत सरकवत दक्षिण अमेरिकेच्या टोकाजवळ आणली. आणि तिथे ती ठेवून ते म्हणाले, "उत्तर अमेरिका आणि दक्षिण अमेरिका असे दोन प्रदेश इथे आहेत असे आमच्या कानावर आलेय."

"त्या प्रदेशांना मी वळसा घालून जाईन."

"इथेच तू चुकतोस." राजेसाहेब मॅगेलनकडे तोंड करून म्हणाले, "तुला पृथ्वीप्रदक्षिणा करायची आहे. मला फक्त सामुद्रधुनी शोधून पूर्वेची मसाल्याची बेटे ताब्यात घ्यायची आहेत. ही बेटे पश्चिमेकडून जवळ आहेत एवढे सिद्ध कर."

विचार करता करता मॅगेलनच्या समोर त्याच्या देशाचा राजा उभा राहिला. आपल्या देशासाठी आणि या राजासाठी आपण जीव धोक्यात घालून पूर्व दिशेने लंका, मलाक्का वगैरे देशापर्यंत जाऊन मसाल्याच्या बेटांची माहिती आणली आणि नोकरीत बढतीची अपेक्षा केली तर कद्रु पोर्तुगीझ राजाने आपला दरबारात अपमान केला आणि इथे स्पेनचा राजा बैठकीसाठीही केवढा थाटमाट ठेवतोय.

...इतक्यात बॅन्ड थांबला.

मॅगेलन आणि त्याचा सासरा आता एका प्रशस्त कमानीसमोर उभे राहिले होते. समोरून दोन उंची पोषाखातले शिपाई आले. मॅगेलनला आणि त्याच्या सासऱ्याला त्या दोघांनी कडक सलाम ठोकला आणि वर चलण्याची खूण केली.

उंची पर्शियन जाजमावरून पावले टाकत ते दोघे वरच्या दिवाणखान्यात आले. हा दरबारी दिवाणखाना ऐश्वर्याने झगमगत होता. रंगीबेरंगी काचांची झुंबरे, मोठ मोठे गुळगुळीत खांब, भिंतीवर हिंस्त्र श्वापदांच्या मुंडक्यांच्या रांगा, तलवारी, चिलखते, पृथ्वीगोलाचे नकाशे, शिसवीच्या तुकतुकीत

टेबलावर मांडलेली फळे, निरनिराळ्या आकारांचे मद्यांचे बुधले आणि चिनीमातीचे मिंगबाऊल्स....वाडगे....बरण्या....

" हे सारे सामान जहाजावर भरून देऊ. निष्णात खलाशी देऊ आणि मोहिम यशस्वी झाल्यावर..."

–राजेसाहेबांनी राजदंड वर उचलला आणि म्हटले, " स्पेन देशासाठी पराक्रमाची शर्थ करणाऱ्या साहसी वीराला आम्ही काय वाटेल ते देऊ. जे मागशील ते देईन. पण सामुद्रधुनी शोधल्यावर ."

राजेसाहेब उठून गेले. बैठक संपली.

बॅन्डच्या घोषात मॅगेलन आणि त्याचे सासरे राजवाडयाबाहेर पडले.

मॅगेलनला दिलेली पाच जहाजे जय्यत तयार होऊन सेव्हिली बंदरातून सुटण्याची वेळ जवळ आली. २० सप्टेंबर १५१९ तारीख होती ती. किनाऱ्यावर राजे चार्ल्स, स्पेन देशातले रोमच्या मुख्य पोपचे प्रतिनिधी, मॅगेलनचे सासरे, सासू, मॅगेलनची पत्नी आणि छोटा मुलगा निरोप द्यायला उभे होते. सेव्हिली बंदर लोकांनी भरगच्च भरले होते. बॅन्डचे पथक शांतपणे उभे होते. घडयाळात बाराचे ठोके केव्हा पडतात आणि चर्चमधून घंटेचा टोल केव्हा पडतो याकडे सर्वांचे कान लागले होते.

....तोच घाईघाईने सासरे मॅगेलनच्या कानात म्हणाले, " पोर्तुगालचे राजे तुमच्यावर फार रागावले आहेत. तुम्ही त्यांच्याकडे न जाता स्पेनचा–शत्रुपक्षाचा आधार घेतलात. बोटीवर पोर्तुगीझ खलाशी पेरले आहेत. जीवाला सांभाळा. दगाफटका होईल...."

मॅगेलनने हसत हसत छाती फुगवून वर सूर्याकडे पाहिले आणि तो सासऱ्यांना म्हणाला– " आम्ही दोघे स्वतःच्या गतीने वरवर जातो, स्वतः-च्या गतीनेच खाली खाली येतो." असे म्हणून त्याने पॉपी कुत्र्याला ' चलो ' म्हटले. सासरे भोळसटपणे म्हणाले " आम्ही दोघे म्हणजे एक तुम्ही आणि दुसरे...." पॉपीकडे पहात पहात मॅगेलनने सूर्याकडे बोट दाखवले.

९६३० ८।९।८४

....तोच चर्चच्या घंटेचा बाराचा ठोका पडला. ठण....ठण....ठण ....ठणठणाट होत गेला...बॅन्ड वाजू लागला. बंदुकीचे बार हवेत उडाले आणि – त्रिनीदाद, सॅम अॅन्टानिओ, सँटीआगो, कन्सेपशन आणि लहानात लहान असणारे व्हिक्टोरिया या पाच जहाजांनी सेव्हिली बंदराचा किनारा सोडला. डेकवरून मॅगेलन अजूनही नळकांडीतून आपल्या छोट्या मुलाचे हातवारे पहात होता. रडणाऱ्या पत्नीचा चेहरा पहात होता. गहिवरून गंभीर झालेले सासरे, ऊर भरून आलेले स्पेनचे बिशप आणि दिलखुलासपणे हसणारे स्पेनचे राजेसाहेब यांचे चेहरे अजूनही त्याला स्पष्टपणे दिसत होते. मग मात्र त्याने रडवेला चेहरा पॉपी कुत्र्याकडे वळवला....

त्याला नळकांड्यातून दिसत नव्हते ते एकच – उद्या या लोकांची आणि आपली गाठ भेट होणार नाही....

.... सेव्हिली बंदर मागे पडले. स्पेन देशाचा किनारा मागे गेला आणि पाहता पाहता तीन-चार महिने उलटले. डिसेंबरचा थंडीचा कडाका आता सुरू होणार असे वाटत असतानाच हवेत उकाडा जाणवू लागला. दिवस-रात्र जहाजे एका ओळीत पश्चिमेच्या रोखाने जात होती. रात्रीचा अंधार, सकाळचे धुके, मध्यान्हीचा कडकडीत उष्मा, कधी हलके-फुलके घोंघावत येणारे वादळ तर कधी दरदरून घाम फुटेल अशा लाटांचे थैमान....पाचही जहाजे पुढे पुढेच सरकत होती. कुठल्याशा नव्या देशाची-दक्षिण अमेरिका देशाची किनारपट्टी अधूनमधून नळकांडीच्या टप्प्यात येत होती. पण कॅप्टन मॅगेलन किनाऱ्यावर थांबायला तयार होत नव्हता. किनारा आला रे आला; डोंगर-झाडे दिसू लागली की मॅगेलन बोटी वळवण्याचा आणि मध्य समुद्रात आणण्याचा हुकूम देत होता. माणसाच्या सहवासासाठी भुकेलेले खलाशी साफ कंटाळून गेले होते.

नकाशा तयार करणारा कार्टोग्राफर सिबास्टीन डेलकानो आणि प्रवासाचे इतिवृत्त लिहिणारा–लॉगबुक लिहून मॅगेलनची त्यावर सही

घेणारा अॅन्टानिओ पिगाफेटा हे दोघे फर्डिनंड मॅगेलनचे जानी दोस्त होते. शाळेतले सवंगडी. कर्मधर्मसंयोगाने मॅगेलनच्या हाताखाली आज त्यांना काम करावे लागत होते. आणि मॅगेलन पूर्वीची मैत्री स्मरून त्यांना 'अरे-तुरे' म्हणत अगदी भावाप्रमाणे संभाळत होता. पण तेही, पाण्याला पार कंटाळले होते. महिने आणि महिने नुसते पाणीच....

....दुपारची वेळ होती. कार्टोग्राफर डेलकानो आणि लॉग रायटर अॅन्टानिओ कॅबिनमध्ये गप्पाटप्पा मारत बसले होते. टेबलावर नकाशा पसरलेला होता. इतक्यात त्यांच्या कॅबिनमधे मॅगेलन शिरला. वाऱ्याने नकाशाचा एक कोपरा फडफड करीत होता. शिरता शिरता या कोपऱ्यावर लोखंडी साखळीचे टोक ठेवत मॅगेलन डेलकानोला म्हणाला, "कानो, अरे नकाशाचे टोक असे वाऱ्यावर फडफडत कसले ठेवतोस. समजा कागदाचा तुकडा तुटून पडला आणि चुकून उडाला तर ?"

"—समुद्रात समुद्र मिळेल. पण एक लाट उठणार नाही" कानो हसत म्हणाला, "मॅगेलन उर्फ फर्डी, अरे हा कागदाचा तुकडा अगदी कोरा आहे. यावर जमिनीच्या रेषा नाहीत की अक्षांश-रेखांशाच्या केसाएवढया तारा नाहीत. आहे फक्त निळ्या रंगाचा समुद्र !"

"म्हणूनच त्याला जपायचे. खलाशाने प्रथम समुद्राला जपायचे – खऱ्या आणि कागदावरच्या. मग समुद्र खलाश्याची—खऱ्या आणि कागदा-सारख्या कस्पटासमान खलाशाचीही काळजी घेतो." मॅगेलनच्या या तडफदार आणि व्यवहारनिष्ठ उत्तराने डेलकानो आणि अॅन्टानिओ दोघेही शरमिंधे झाले.

मॅगेलन आता केबिनमधून बाहेर पडणार तोच डेलकानो म्हणाला, "फर्डी, क्षमा कर मला. मी माझी चूक सुधारतोय पण तू तुझी केव्हा सुधारणार ?"

"मी चूक करतोय ?" आश्चर्याने मॅगी म्हणाला.

"हो तर" डेलकानो धीर एकवटून म्हणाला, "किनाऱ्यावर

थांबायचे तर किनारा दिसू लागला की तू जहाजे मध्यसमुद्रात हाकारतोस. काय म्हणायचे तुला ? फार विक्षिप्त आहेस तू ! ”

मॅगेलनने डेलकानोच्या खांद्यावर हात ठेवला. मग शांतपणे तो त्याला म्हणाला, “ अरे,— जमीन शोधणे हे काही आपले ध्येय नाही. आपल्याला सामुद्रधुनी शोधायची आहे.”

“ हो. पण खलाशांना नवा भू-प्रदेश हवा. त्यांना मौजमजा, नवेनवे अन्न-फळे, दारू...” डेलकानो एकदम थांबला. मॅगेलन हा हाडाचा खलाशी आहे. संशोधक आहे. पण इतर खलाशी केवळ हाडे अंगावर बाळगणारे आहेत. चैन-मौज यांना चटावलेले आहेत हे ध्यानात येऊन तो म्हणाला, “ फर्डी, तुझ्याविरुद्ध इतर खलाशी बंड करण्याच्या विचारात आहेत.”

“ कोण बंड करतोय ? ”

“ मेंडोझा ”, पिगाफेटा म्हणाला, “ हा मेंडोझा त्या पोर्तुगालच्या राजाचा माणूस आहे. मला प्रथमपासून त्याचा संशय होताच.”

“ ठीक आहे. मी त्याचा काटा काढतो. उद्या समुद्रावर त्याचे प्रेत तरंगत राहील ” मॅगेलन दूर समुद्राकडे पहात म्हणाला.

“ आणि लोकांना कळले तर ? बंड वाढत नाही का जाणार ? ” घाबरत घाबरत डेलकानो म्हणाला.

“ उद्या त्याच वेळी आपण जवळ येणाऱ्या पहिल्या बंदरात आश्रय घेऊ. खलाशांना नवा प्रदेश मिळाला की विसरतील ते मेंडोझाला. माणूस माणसाला लवकर विसरतो....” असे म्हणून मॅगेलनने आपल्या आवडत्या पॉपी कुत्र्याच्या खांद्यावर लाडाने हात ठेवला. पॉपी भोः भोः करून ओरडू लागला. त्याबरोबर डेलकानो आणि ॲन्टानिओ कामाला निघाले.

पहाटेच्या गार अंधारात मॅगेलनची ध्वजनौका त्रिनीदाद, समोर आलेल्या किनाऱ्याला लागली. समोरच्या हिरव्यागार, वनश्रीने बहरलेल्या दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्याला लागली. पाठोपाठ इतर नौका आल्या. समोरच्या

हिरव्यागार, वनश्रीने बहरलेल्या दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यावर खलाशी पाय ठेवायला बाहेर पडले. निरनिराळी फळे, पोपटाच्या पिसांचे कपडे घालणाऱ्या बायका दारू, कोंबड्या, मास हे सर्व पाहून खूष झालेल्या त्या दोन-अडीचशे, खलाशांना कळलेच नाही की आपला एक सहकारी आणि प्रवास थांबवा, बोटी मागे वळवा ' सांगणारा जिवाभावाचा सवंगडी लोखंडी साखळीसकट खोल समुद्रात बुडून मेला... फक्त मॅगेलनला आणि एक दोघांना तेवढे हे सत्य माहीत होते...

...समोरच्या अननसाकडे पहात चार खलाशी दारू पिऊन बरळत होते. किनाऱ्यावर अननसांची झाडे होती. ताडगोळे होते. अनेक फळझाडे, फुले—पक्षी होते. पण माणसे नव्हती. जहाजांना पाहूनच माणसे दूर पळून गेली होती.

" हे काय आहे ? " प्यालेला एक खलाशी दुसऱ्याला म्हणाला.

" अवोबोरा भोपळा ! "

" माका—अननस ! " दुसरा म्हणाला. भोपळा की अननस ? या फळाच्या नावावरूनच त्या दोघांची लढाई लागली. इतक्यात मॅगेलन तिथे आला. सपकन त्याने त्या जर्द पिवळ्या—केशरी अननसावर वार केला आणि कपची उडवली. एक तुकडा तोंडात टाकून या नव्या फळाने तोही बेहोष झाला. गाऊ लागला. नाचू लागला. गोऱ्या माणसाला नाचताना पाहून हळूहळू पळून गेलेले रानटी लोकही पुढे आले. मॅगेलनने आपल्या माणसांच्या कानांत काहीतरी सांगितले. चार नावाडी धावत जहाजांवर गेले. आरसा, काचेचे कप, मणी, रेशमी वस्त्रे घेऊन आले. त्यांनी नाणीही आणली.

रानटी लोक या वस्तूंवर तुटून पडले. नाणी दातांनी चावत सुटले. हळूहळू ते लोक जहाजांवर आले.

मॅगेलन या धिप्पाड लोकांवर बेहद्द खूष झाला होता. ही माणसे मॅगेलनच्या माणसांहून ताडमाड उंच होती. त्यांचे पावलांचे आकार मोठ्या

दुधी भोपळ्याएवढे होते. दोन माणसे पकडून राजेसाहेबांना भेट केली तर –मॅगेलनच्या मनात विचार आला.

झटपट तो कामाला लागला.

त्याने या लोकांना जहाजातील अनेक वस्तू आमिष म्हणून बहाल केल्या. आणि हे करता करता दोघांच्या पायात साखळदंडांच्या कड्याही घातल्या.

राक्षसी, धिप्पाड देहाचे ते लोक लोखंडी साखळदंडाच्या कड्या बड-वत आवाज करीत आनंदाने बेहोश होत नाचू गाऊ लागले....एकच गोंधळ गलका माजला आणि त्या गोंधळात मॅगेलनने बंदुकीचा बार करून जहाजे समुद्रावर हाकारली....

जहाजाच्या अगदी वरच्या डेकवर मॅगेलन विचार करत होता. राक्षसी पाय असणाऱ्या त्या प्रदेशाला त्याने 'पॅटॅगोनीया' हे नाव दिले होते. प्रचंड मोठ्या पावलांचा प्रदेश असे या प्रदेशाचे नाव दिले तरी सामुद्रधुनी काही सापडत नव्हती. मॅगेलन संत्रस्त झाला होता. वेडापिसा झाला होता.

सहजच त्याचे लक्ष समोरच्या पाण्याकडे गेले.

तो डेलकानोला म्हणाला " कानो, या पाण्याचा रंग पहा कसा विलक्षण वेगळा दिसतोय !"

" पाण्याचा रंग वेगळा कसा असेल ? वर आकाशात ढग आलेत म्हणून पाणी निळ्याऐवजी काळे दिसतेय," डेलकानो कपाळावर आठ्या आणत म्हणाला.

" चव तर पहा या पाण्याची ! " मॅगेलन त्याला म्हणाला आणि खाली वाकून पाणी काढण्यासाठी तो डेकचा जिना उतरून अगदी खोल तळ-घराशी आला. तळघरातल्या काचेच्या खिडकीमधून त्याने समुद्राचे निरीक्षण केले. अनेक पाणथळ वनस्पती त्याच्या नजरेत आल्या.

मग मात्र त्याची खात्री झाली की जमिनीत शिरणाऱ्या समुद्रभागातून आपण जात आहो. ज्या एका सामद्रधुनीच्या शोधात आपण निघालो आहो

ती सामुद्रधुनी आपल्या हाती आली. आपण तिच्या तोंडाजवळ आलो.

त्याने भरभर वर जाऊन वेध घेतले.

विषुववृत्तापासून खाली, मकरवृत्ताच्याही खाली जवळ जवळ ५०° अक्षवृत्तावर आपण आलो आहो. त्याने दोर सोडून तळाचा अंदाज घेतला. वर आकाशात ढगांचा अंदाज घेतला. त्याचा प्रत्येक अंदाज सांगत होता की त्याला हवी असणारी सामुद्रधुनी हाती आली आहे. त्याचा लाडका पॉपीही भोः भोः करून त्याला साथ देत होता.

आता प्रवास अधिक खडतर, बिकट झाला. समुद्राचा हा टप्पा भयंकर उथळ होता. त्याचे एक जहाज आधीच बुडाले होते. आणि मेंडोझाच्या मृत्यूची-खुनाची बातमी फुटून एक जहाज बंड करून त्याच्या लोकांनी माघारी परतवले होते. अनेक संकटे येत होती. उथळ समुद्र, सभोवती मोठमोठाले हिमपर्वत, धुके, बोट कशावर आदळेल-आपटेल हे कळत नव्हते, ही सामुद्रधुनी किती मैल पसरली आहे तेही कळत नव्हते, सामुद्रधुनी संपल्यावर आपण निघणार कुठे ? हेही कळत नव्हते. वारा तुफान वहात होता आणि समुद्राचा उथळपणा जणू काय जहाजांना पाण्यातून कासवाने वर यावे तसा वर आणीत होता....खाली नेत होता....कधी किनारपट्टीवर जाळ दिसत असे तर कधी अगदी अरुंद, चिंचोळ्या वहाळ भागातून त्याला तीन जहाजे हाकारावी लागत होती. जहाजावरचे खलाशी चिडलेले, मॅगेलनच्या प्रवासाला वेडेपणा म्हणत कसे तरी कामे करीत होते आणि मॅगेलन सामुद्रधुनी ओलांडण्यात इतका गुरफटला होता की या मार्गाची नोंद न् नोंद तो लॉगबुकमध्ये ॲन्टिनिओला ठेवायला सांगत होता— किनाऱ्यावर जाळाचे पट्टे उठत होते म्हणून त्याने या प्रदेशाला ‘ टेराडेल-फ्यूगो ’ नाव दिले.

...एक दिवस पहाटेचा मॅगेलन डेकवरती उभा राहून आकाशातील तारकांचे निरीक्षण करीत होता. हा त्याचा आवडीचा छंद होता. सामुद्रधुनीत शिरल्यानंतर बऱ्याच दिवसांनी त्याला आज आकाश पहायला

सवड मिळाली होती. आणि वरचे आकाश आज त्याला काही वेगळेच दिसतेय असे वाटू लागले. आपण पृथ्वी गोलाच्या दुसऱ्या अंगाला तर आलेलो नाही ना ? त्याला संशय आला....

....आणि तो संशय सकाळी बळावला.

सकाळी त्याची नजर समोरच्या समुद्रावर गेली.

समुद्र एकदम शांत होता. शांत...त...

अनेक दिवस आले-उगवले, गेले. सूर्य वर आला आणि पश्चिमेच्या रोखाने निघालेल्या त्या जहाजांना मावळताना दिसत होता....

....पण एक दिवस अचानक पहाटे पहाटे जहाजावरचे खलाशी नाचू गाऊ लागले.पहाटेपासूनच जहाजांवर आनंदोत्सव साजरा होत होता.मॅगेलन खडबडून झोपेतून जागा झाला. तोच अॅन्टानिओ आणि डेलकानो त्याच्या कॅबिनजवळ आले. त्याला म्हणाले " कॅप्टन, अभिनंदन ! "

" का ? कशासाठी ? " मॅगेलनने आश्चर्याने विचारले.

" जहाजांची दिशा तू वळवलीस. सर्व खलाशी खूष झाले आहेत. जहाजावर नोव्हेंबर महिन्यातच नाताळ साजरा होत आहे. झाला एवढा प्रवास पुरे झाला. सामुद्रधुनी शोधली. आता गलबते उगवत्या सूर्याच्या रोखाने दिशा बदलून जात आहेत...." पिगाफेटाने समोरच्या उगवणाऱ्या लाल बिंबाकडे बोट दाखवले. " फर्डी, चांगला निर्णय घेतलास ! "

...मॅगेलनने समोर पाहिले.

समोर सूर्याचे लालबुंद बिंब हळूहळू वर येत होते आणि त्या बिंबाच्या रोखाने प्रशांत सागरावर ती तीन जहाजे त्रिनीदाद, मधले एक आणि शेवटचे सर्वात लहान व्हिक्टोरिया तरंगत तरंगत मार्ग आक्रमित जात होती...

मॅगेलन मनात हसला

पृथ्वी गोल आहे. जहाजांनी दिशा बदललेली नसून जहाजे पहिल्याच दिशेला जात आहेत. कोलंबस म्हणायचा त्याप्रमाणे पश्चिमेला जाता

जाता पूर्वेला जाता येते हेच खरे. पण मनातले विचार त्याने तसेच ठेवले आणि त्या खलाशांमध्ये जाऊन तोही धूर्तपणे नाचूगाऊ लागला ... नंतर मात्र पिगाफेटा आणि डेलकानो या आपल्या मित्रांच्या कानात तो म्हणाला, " स्पेनच्या राजाला जे हवे ते मी देणार होतो आणि दिले. एक सामुद्रधुनी दिली. शिवाय आणखी एक नवा प्रशांत असणारा सागर दिला. राजेसाहेबांची इच्छा मी पुरी केली. मला आता माझे स्वप्न पुरे करायचे आहे."

" म्हणजे काय करायचे आहे ? " पिगाफेटा आणि डेलकानोजवळ हळूच येऊन उभा राहिलेला आणखी एक खलाशी म्हणाला.

" म्हणजे पृथ्वीला वळसा घालायचा आहे. एक प्रदक्षिणा घालायची आहे. "

" पण हा सागर किती दूरवर पसरला आहे हे ठाऊक आहे का तुला?"

" ते मी शोधणार आहे " मॅगेलन म्हणाला.

" कसे शोधणार ? कुठल्या अंगाला समुद्रातून बाहेर पडणार ? " आणखी एक खलाशी म्हणाला. एकापाठोपाठ अनेक खलाशी आले आणि तावातावाने म्हणाले,

" पाणी नासून गेलेय ! "

" आटा आळ्यांनी भरलाय ! "

" त्यात उंदरांच्या लेंड्या पडल्यात ! "

" जहाजे जीर्ण झाली आहेत ! "

" खलाशांना स्कर्व्ही झालाय ! "

" आम्हाला विनाकारण मरण नकोय ! "

" नाही ना मरायचे ? " मॅगेलन म्हणाला, " मग चला मी तुम्हाला मसाल्याची बेटे दाखवितो. तिथे आपल्याला गडगंज पैसा मिळेल. दारू मिळेल. नवे नवे लोक–बायका मिळतील. या मसाल्यांच्या बेटांवरील बायकांबरोबर तुम्ही लग्न करा. त्यांची मुले आपल्या धर्मात येतील. आपण

धर्मप्रसार करू.''

घष्टपुष्ट शरीराचा रुबाबदार मॅगेलन आता शिडाच्या डोलकाठीला टेकून इतक्या ऐटीत उभा राहिला की त्याच्या डोक्यावर आलेला मध्यान्हीचा सूर्यही क्षणभर तिथेच स्थिर उभा आहे असे वाटले. मॅगेलन आता एखाद्या ग्रीक महापुरुषाप्रमाणे दिसत होता. त्याच्या डोक्यामागे सूर्याचे वलय दिसत होते.

सर्व खलाशी आपापल्या जागी निघून गेले. मॅगेलन लॉगबुक भरणाऱ्या पिगाफेटाला आणि नकाशे काढणाऱ्या डेलकानोला म्हणाला–'' या ठिकाणचे अक्षांश–रेखांश लक्षात ठेवा. इथे या ठिकाणी एक भौगोलिक आणि ऐतिहासिक चमत्कार जगाला दिसून येईल. उगवणारा दिवस मावळण्यापूर्वी पुन्हा उगवत राहिला....स्पेनची चाकरी वजावणारा एकनिष्ठ सेवक मॅगेलन एक सामुद्रधुनी आणि एक महासागर शोधून संपला आहे. आता यापुढे जो तुम्हाला दिसतोय तो जगातली पहिली पृथ्वीप्रदक्षिणा घालणारा नावाडी–मॅगेलन.''

खलाशी आता मसाल्याच्या बेटांचा खमंग वास हुंगत दिवस काढत राहिले, आशेवर दिवस भरत राहिले.

...आणि खरोखर एक दिवस असा उगवला की ते लहान लहान बेटांच्या समुदायांपाशी पोचले. ही छोटी छोटी बेटे ताड–नारळ–माड या झाडांनी व्यापलेली होती. हिरवीगार, फळाफुलांनी, भरगच्च भरलेली... येथील लोक रानटी होते. पण गरीब होते. झाडावर घरे बांधून ते राहात. बाण, धनुष्य यांनी शिकार करीत. काही काही अति सुधारलेले लोक मिरी वेलदोडे यांच्या बागा लावत...

मॅगेलनचे खलाशी या बेटांतील लोकांमधे मिसळून गेले. जिनसांची देवाण-घेवाण झाली. व्यवहार वाढत गेले. खुद्द मॅगेलन आपला धर्मप्रसाराचा हेतू साध्य करण्यासाठी काबाडकष्ट करीत होता. त्याने एक छोटे दगडाचे चर्च बांधले. सकाळ-संध्याकाळ चर्चमधे लोक जमू लागले. एका बेटावरचे लोक मॅगेलनच्या धर्माखाली आले. नंतर दुसरे बेट... तिसरे बेट....

धर्मप्रसाराच्या एका उद्दाम कैफातच तो बेटांमागून बेटे स्वतःच्या अधिपत्याखाली म्हणजे स्पेनच्या राजाच्या झेंडयाखाली आणत होता. प्रत्येक बेटावर जाऊन एक चर्च बांधणे, स्पेनचे निशाण फडकवणे आणि आपल्या लोकांसाठी व्यापारी वखार खोलणे इतके काम तो करीत असतानाच आजच्या फिलीपाइन्सजवळील त्या बेटांवरील एका नायकाने मॅगेलनविरुद्ध बंड पुकारले. बघता बघता अनेक लोक त्यात सामील झाले...

पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याच्या कैफात असलेल्या मॅगेलनने आपला प्रवासी पेशा विसरून समरांगणात धाव घेतली. मॅगेलनचे खाऊन पिऊन ऐदी बनलेले खलाशी एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला अनेक बेटांवरचे अर्धरानटी अवस्थेतले लोक असे युद्ध सुरू झाले. मॅगेलनच्या हातात तलवार काय ती उरली. बंदुकीची दारू संपून गेली होती. आणि दुरून दुरून शत्रूपक्षाचे बाण मॅगेलनच्या खलाशांवर येऊन पडत होते. ते खलाशी मॅगेलनला मागे ठेवून आपापल्या गलबतात जाऊन लपून राहिले. आणि एकटयाने झुज देणाऱ्या मॅगेलनला रानटी लोकांनी त्यांच्या पद्धतीने ठार केले. त्याचे हात-पाय डोके तोडले.

.... कसेबसे पळत पळत गलबतावर गेलेले लोक मॅगेलनच्या मृत्यूने गर्भगळीत झाले आणि तीन जहाजे हाकारून स्वदेशाला जाऊ लागले. या लांबवरच्या पल्ल्यातून फक्त एकच – सर्वात लहान असणारे जहाज 'व्हिक्टोरिया' स्पेनच्या सेव्हिली बंदरात पोहोचले.

याच छोटयातल्या छोटया जहाजावरच्या १५।२० माणसांनी मॅगेलनच्या मृत्यूची बातमी स्पेनच्या राजेसाहेबांना दिली. आणि त्या बातमीने राजेसाहेबांच्या डोळ्यांतून नव्या शोधलेल्या सामुद्रधुनीतल्या पाण्याएवढे अश्रू गळत राहिले.

जगाच्या नकाशावरील एका सागराला 'प्रशांत महासागर' –पॅसिफिक महासागर नाव देऊन आणि एका सामुद्रधुनीचा पत्ता दाखवून मॅगेलन निघून गेला होता.

## ॥ सर फ्रॅन्सिस ड्रेक ॥

दर्यावर्दी फ्रॅन्सिस ड्रेक याचे नाव काही इतिहासकार कोलंबस-मॅगेलन-वास्को-द-गामा वगैरे मान्यवर दर्यावर्दी संशोधकात घेत नाहीत. याचे कारण असे की ड्रेकचा लौकिक 'समुद्र-चाचा' असा त्या काळी झालेला होता. तो समुद्रावर लूटमार, चाचेगिरी करणारा म्हणूनच प्रसिद्ध झाला होता. किंबहुना त्याच्याविषयीचा हा डंका स्पॅनिश खलाशांनीच अधिक पिटलेला होता. आपल्या इकडे शिवाजी महाराजांना आंग्रे ज्याप्रमाणे मदत करीत आणि म्हणून चाचेगिरी करणारे ठरले होते तसेच ड्रेकबद्दल युरोपात झाले होते.

परंतु ड्रेक हा केवळ समुद्र चाचा नव्हता. इतर दर्यासारंगांच्या अंगी असणारे शौर्य-धैर्य-चातुर्य-साहसवृत्ती आणि संघटन कौशल्य हे गुण त्याच्याही अंगी होते.

ड्रेकच्या काळी स्पॅनिश आरमाडा स्पॅनिश जहाजाचा लढाऊ काफिला– एक तऱ्हेची दहशत सर्वत्र पसरवत होता. इतर देशांना समुद्रावर संचार करण्याची भीती वाटत असे. त्यात पुन्हा पोप-महाराजांनी टॉरडेसीलच्या कराराअन्वये समुद्रावरच्या संचाराची वाटणी स्पेन आणि पोर्तुगाल या दोन कॅथलिकधर्मीय देशात केल्या-मुळे प्रॉटेस्टन्ट धर्मानुयायी इंग्लंडसारखे देश मनात खदखदत होते. एलिझाबेद राणीच्या दरबारातील एक मंत्री विल्यम सेसील यांनी तर स्पष्टपणे एकदा विचारले होते की 'पोप महाराजांना जगाची फाळणी करण्याचा अधिकार कुणी दिला?' या अशा खदखदा-टाचा जिवंत उद्रेक म्हणजे ड्रेक असेच म्हणायला हवे. त्यामुळे ड्रेक जी जहाजांची लुटालूट करीत असे त्याकडे इंग्लंडची राणी कानाडोळा करीत असे. किंबहुना तिच्याच प्रोत्साहनाने ड्रेक हे

सर्व करीत असे असे म्हटले तरी वावगे होणार नाही. मात्र स्पेनच्या धाकामुळे उघड उघड कुणी तसे म्हणून दाखवत नव्हते.

आणि ड्रेक समुद्रावरील जे छापे घालत असे त्यातही एक शिस्त दिसून येते. स्पेन देश त्या काळी दूर दूर वसाहती स्थापत होता. साहजिकच स्पेनची जहाजे मायदेशी परत येताना सोने-रूपे-मसाल्याचे जिन्नस-रेशीम वगैरे घेऊन येत असत. या जहाजांवरती दूरवर जाऊन ड्रेक हल्ले चढवत असे आणि मिळालेला ऐवज इंग्लंड देशाकडे पाठवत असे. स्पेनच्या जहाजांचा पाठलाग करता करता फ्रॅन्सिस ड्रेक हा स्पेन देशातील दूरदूरच्या कॉलनीपर्यंत पोहोचला आणि या निमित्ताने त्याने अर्ध्याअधिक पृथ्वीला पालाण घातले. मॅगेलनने शोधलेली दक्षिण अमेरिकेची सामुद्रधूनी त्याने अत्यंत खडतरपणे पार केली आणि तेथून मोल्युकोज बेटांच्या समुदायातून ड्रेक आफ्रिकेला वळसा घालून पुन्हा स्वदेशी परत आला.

इंग्लंडच्या राणीने त्याचा गौरव करुन त्याला ' सर ' ही बहुमानाची पदवी दिली. स्पॅनिश आरमाराला शह दिला म्हणूनच ड्रेकला हा बहुमान मिळाला. परंतु त्याचा खराखुरा बहुमान म्हणजे मॅगेलनच्या अकाली मृत्युमुळे संपूर्ण पृथ्वी प्रदक्षिणा करण्याचा मान मिळणे हाच होय. एरव्ही ड्रेकने नवे असे काही शोधून काढले नव्हते. इंग्रज लोकांना वसाहती स्थापन करता येतील असे नवे बेट त्याने शोधून काढले नव्हते की सोन्या-रुप्याच्या खाणींचा प्रदेशही अमलाखाली आणला नव्हता. केवळ अंगच्या दर्यावर्दी धाडसामुळे ड्रेक अजरामर झाला.

असा हा वाल्या कोळ्याचा वाल्मिकी ऋषी झालेला दर्यावर्दी —सर फ्रॅन्सिस ड्रेक.

# गोष्ट फ्रॅन्सिस ड्रेकची

इंग्लंडमधल्या प्लेयमाऊथ बंदरावरची ती संध्याकाळची वेळ होती. एका कोपऱ्यात सहा जहाजे बंदर सोडण्याच्या जय्यत तयारीने उभी होती.

या सहा जहाजांपैकी जे आकाराने मोठे होते त्या जहाजाचे नाव 'पेलिकन' होते. आणि या जहाजाचा कप्तान—एक लालबुंद, डोळ्यात धाक-दरारा आणि जरब असणारा माणूस-डोळ्यांवर हात ठेवून तो एकटक बंदराकडे डोळे रोखून पहात होता. बंदराकडून एखादी होडी येते का हे तो अस्वस्थपणे पहात होता.

अखेर सूर्यबिंब क्षितिजरेषेखाली गेले. पाहता पाहता ते प्लेयमाऊथ बंदर पार काळोखात बुडून गेले. बंदराकडून होडी येण्याची वाट पाहणारा तो जहाजावरील राकट चेहऱ्याचा माणूस आता कमालीचा अस्वस्थ झाला. जवळच्या माणसाने त्याच्या पाठीवर थाप मारून म्हटले "मित्रा ड्रेक, एवढा उतावीळ का झालास? कोण येणार आहे का बंदरावरून?"

फ्रॅन्सिस ड्रेकने त्याच्या मित्राकडे गंभीरपणे पाहिले आणि म्हटले, "जॉन, माझ्या मित्रा! मी वाट पाहतोय एका छोट्या होडीची. होडी-मचवा-तराफा हवे ते म्हण. पण ती आत्ता या क्षणी यायला हवी. ती आली नाही तर पर्यटणात उत्साहच येणार नाही."

"जॉन, आपल्या पर्यटण मोहिमेसाठी राणीसरकार सोने पाठवणार आहेत. शिवाय 'टेरा ऑस्ट्रेलियाचा' एक ज़ुजबी नकाशा धाडणार आहेत!"

"टेरा ऑस्ट्रेलिया—म्हणजे नवा भूप्रदेश!" जॉन एकदम आश्चर्यचकित होत म्हणाला.

"हो," ड्रेकने उत्तर दिले आणि पुन्हा तो बंदराकडून एखादी होडी येते का ते पाहू लागला. तेवढ्यात त्याचा चेहरा उजळला. जॉनने चेहरा पाहून म्हटले, "तुझी होडी आलेली दिसते?"

पण आता फ्रॅन्सिस ड्रेक उत्तर द्यायच्या मनस्थितीत नव्हता. तो शिडी उतरून जहाजाच्या दरवाजापाशी आला. तेवढ्यात ती छोटी होडीही

चुळुक् चुल्, चुळुक चुल् करीत जहाजाजवळ आली आणि आतल्या दोन माणसांनी जहाजावरचे लोंबकळणारे दोर पकडले. नंतर होडी स्थिरावल्यावर त्या दोघांनी आपले उजवे हात वर करून डाव्या हाताने आपले नाक पकडले. ड्रेकनेही तसे केले. खूण पटली. त्यासरशी त्यांनी एक अवजड संदूक—पेटी, जहाजामध्ये ठेवली. ड्रेकला सलाम ठोकला आणि “ लॉंग लिव्ह द् क्वीन ” असे म्हणून होडी पुन्हा बंदराकडे हाकारली.

ड्रेकने ती पेटी ओढत जॉनला म्हटले ‘ चल, आत नेऊ.’ तेवढ्यात त्याला काही आठवले, त्याने झाकण उचकटले, हात आत घातला आणि हाताला हवी ती वस्तू लागून त्याचा चेहरा फुलून आला.

ड्रेकने आपला चिलखती पेहराव काढला. कपडे काढता काढता तो जॉनला म्हणाला, “ मला या स्पॅनियर्डस्‌चा संपूर्ण निःपात करून टाकायचा आहे. समुद्रावर म्हणे इतर राष्ट्रांनी फिरायचे नाही. कॉलन्या स्थापायच्या नाहीत. समुद्र काय यांच्या बापाचा आहे... ?”

तावातावाने पेटून बोलणाऱ्या फॅन्सिस ड्रेकला जॉन म्हणाला, “ ते खरे रे. स्पॅनिश आरमाराचा आपण चक्काचूर करायला हवा. पण हे काम म्हणजे कोंबडी मारण्याइतके सोपे नाही.” असे म्हणून उठत तो ड्रेकला म्हणाला, “ मित्रा, टेरा ऑस्ट्रेलिया शोध असे राणीने सांगितले आहे म्हणतोस, पण तसे काही सरकारी दप्तरातून तुला सनद द्यावी तसे लिहून दिलेय ? का मोघम सांगितले आहे ? ”

“ लिहून कशाला हवे. राणीसरकारचा शब्द आहे तो. इंग्लंडची राणी एलिझाबेथ म्हणतेय....” जॉनच्या जवळ येत ड्रेक म्हणाला.

“ बरे, ते जाऊ दे. आता आपला पहिला मुक्काम कुठे टेकवायचा ? ” जॉनने ड्रेकला विचारले.

समोर पडलेल्या नकाशाची वळकटी उलगडता उलगडता ड्रेक आता उत्तर देणार तोच त्याला कसली तरी चाहूल लागली. तो गप्प बसला. दारावर ‘ टक्टक् ’ झाली आणि आवाज आला, “ कप्तानसाहेब, वारा

पडलाय. नवे शीड उभारू का ?"

"ओ यस. डेफिनेटली. पीटर, गो अहेड." एक दोन मिनिटे स्तब्ध राहिल्यावर ड्रेक जॉनला म्हणाला, "प्रथम आपण ॲटलांटिक महासागर पार करून मॅगेलन गेला तसे विषुववृत्ताखाली वीस अंश जाऊ. कोलंबस कॅरेबियन बेटांकडे गेला. तिथे जाण्यात हशील नाही. आपण मॅगेलन-प्रमाणे–"

"– हे बघ," जॉन एकदम त्याला म्हणाला, "मॅगेलन हा दर्यावर्दी होता. आपण आहोत लूटमार करणारे."

"फक्त स्पॅनिश जहाजांना लुटणारे" ड्रेकने त्याला दुरुस्त केले.

"का ? डच जहाज सोने-नाणे घेऊन येतेय तर त्याला का आपण सुखासुखी सोडणार आहो ?" जॉनने त्याला विचारले आणि हसत म्हटले, "नाऊ टेल मी ड्रेक ?"

"अरे पण लुटालूट कशासाठी ? इंग्लंडला आरमार तयार करता यावे, इंग्रज खलाशांचे धैर्य वाढावे म्हणून स्पॅनिश आरमाराबरोबर दोन हात येतील का आपल्याला करता ? त्याची रंगीत तालीम नको करायला ?"

"ते कबूल. पण स्पॅनिश जहाजे बुडवणे एवढाच आपला उद्देश असेल तर मग ॲटलांटिक महासागर, पॅसिफिक महासागर एवढे दूरवरचे पल्ले हवेत कशाला ? इथेच थांबू या की. समोर स्पॅनिश जहाज आलं की बुडवू." जॉनने आपल्या मनातले सांगितले.

त्यावर खो खो हसत ड्रेक म्हणाला, "बा मित्रा, अरे इथेच तू चुकतोस. स्पेनच्या जवळपास त्यांची जहाजे लुटणे धोकादायक आहे. परंतु स्पॅनिश जहाजे पॅसिफिक महासागरातील पेरू, चिली वगैरे प्रदेशांकडे आज वसा-हती स्थापायला जातायत. ही जहाजे त्यांच्या मायदेशापासून पार दूर जातायत. त्यांना आपण इथे येऊन लुटायचे, यातच खरा कावेबाजपणा आहे."

ड्रेकचे 'पेलिकन' जहाज आणि त्या पाठी पाच इतर जहाजे संथपणे

जात होती. या जहाजावरच्या खलाशांना वाटत होते की, आफ्रिकेत व्यापार करायला आपण जातोय. उद्या अॅलेक्झांड्रिया बंदरात पोहोचलो की बरेच घबाड आपल्या हाती येईल. पोटापाण्याची विवंचना टळेल. परंतु जाणत्या आणि अनुभवी खलाशांच्या हे लक्षात आले की ड्रेक जहाजाला आफ्रिकेच्या बंदराकडे वळवत नाही. आपले जहाज विषुववृत्ताच्या रोखाने खाली खाली जातेय. अखेर या खलाशांचेही इतक्या वर्षांचे काही आडाखे होते. आफ्रिकेसाठी कुठे वळायचे हे त्यांना माहीत होते. आकाशाचे चित्र त्यांना चांगले पाठ होते. दिशांचे काठ त्यांना ज्ञात होते.

...कुणालाच काही कळत नव्हते. पण तोंडातून 'ब्र' काढायची कुणाची छाती होत नव्हती. आणि कर्दनकाळ कप्तान ड्रेक मात्र सर्वच खलाशांशी अगदी हसतखेळत होता. त्यांना नव्या नव्या प्रदेशाची आमिषे देत होता. नव्या प्रदेशात सोने-रुपे-हिरे-माणके आहेत, फळे आहेत, दारू आहे सांगत होता. कोलंबस-मॅगेलन यांच्या प्रवासांचे दाखले तो त्यांना देत होता. जातिवंत खलाशाला पायाखाली फक्त समुद्र हवा, तो त्यांना सांगे.

...आणि हे सांगत असतानाच तो नेमका मॅगेलनने नव्याने शोधलेल्या सामुद्रधुनीजवळ आला होता. त्याचीही गलबते या सामुद्रधुनीच्या आसपास अडखळून पडली होती. प्रयत्नांची शर्थ करून त्याचे स्वतःचे 'पेलिकन' जहाज कसेबसे सामुद्रधुनीमधून बाहेर पडले. इतर जहाजे मागे पडली. दोन तुटून बुडून गेली, तीन माघारी परत फिरली....प्रचंड वादळाशी झुंज देत देत तो कसाबसा आता पॅसिफिक महासागरावरून जात होता. आता या अफाट समुद्रामध्ये त्याचे फक्त एकच जहाज उरले होते.

ड्रेकचा जिवलग मित्र जॉन प्रत्येक वेळी ड्रेकला म्हणत असे : आपण समुद्रावर डाका घालणारे लुटारू-दरोडेखोर-चोर-चाचे आहोत. कोलंबस-गामा-मॅगेलन यांच्याबरोबर आपली तुलना कधीच होणार नाही. जॉनच्या या बोलण्याचा ड्रेकवरती आता परिणाम होऊ लागला होता. विशेषतः मॅगेलनची सामुद्रधुनी ओलांडून तो प्रशांत महासागरात शिरला तेव्हा

त्याच्या मनात आले उद्या आपण मृत्यू पावल्यावर आपले हे कर्तृत्व कोण लक्षात घेणार आहे? चोराचा पराक्रम हा चोरीच ठरतो. त्याने दर्या पार केला काय किंवा अति बिकट शिखर गाठले काय, चोर तो चोरच !

...रात्रीच्या शांत वेळी ड्रेक एकदा एकटाच पाळथा पडून विचार करीत होता. त्याचे 'पेलिकन' जहाज संथपणे मार्ग आक्रमत जात होते. वर आकाशात अनेक तारका लुकलुकत होत्या. आकाश निरभ्र होते.

....वरचे आकाश पाहता पाहता तो एकदम रिता होऊन गेला. किती हे माणसाचे कस्पटासारखे अस्तित्व....

विचार त्याच्या मनात येताच त्याने मनाशी एक निर्धार केला की, यांपुढे चाचेगिरी पार सोडून द्यायची आणि एखादा नवा भू-प्रदेश शोधून काढायचा. कोलंबस-मार्कोपोलोप्रमाणे आपणही अजरामर होऊन जायचे... चाचेगिरी बंद करायची आणि संशोधक म्हणून नाव कमवायचे....

हा विचार त्याच्या मनात येतोय तोच दोन खलाशी त्याच्यासमोर येऊन उभे ठाकले. त्या दोघांच्या हातात तलवारी होत्या. ड्रेक पटकन सावध होऊन उभा राहिला. तसा त्याला आदबशीर सलाम ठोकून एक खलाशी म्हणाला, "कप्तान साहेब, आपले जहाज एका बंदरापाशी आलेय. पण समोर बंदरात तीन जहाजे उभी आहेत. आणि पहाटेच्या अंधारातही ती जहाजे स्पॅनिश लोकांची आहेत हे कळून येतेय...."

"स्पॅनिश जहाजे", ड्रेक एकदम म्हणाला. आता त्याच्या अंगातला समुद्रचाचा जागृत झाला. उडी मारूनच तो आपल्या बंदुकीकडे धावला. खलाशांना तडकाफडकी त्याने सावध केले. आणि सकाळ होण्यापूर्वीच त्याने त्या तीन जहाजांवर झडप घातली.

पहाटेची वेळ होती. स्पॅनिश जहाजावरचे लोक बेसावध होते. दोन जहाजे तर पूर्ण रिकामी होती. या जहाजांवरचे लोक बंदरामध्ये मुक्काम ठोकून तेथील रहिवाशांच्या गावात मजा मारायला गेले होते. एकाएकी ड्रेकच्या लोकांनी केलेल्या हल्ल्यापुढे त्या स्पॅनिश लोकांचे काही

चालेनासे झाले. आणि ड्रेकच्या लोकांनी तर विजेच्या चपळाईने आत शिरून प्रथम पिण्याच्या पाण्याची पिंपे ताब्यात घेतली.

अखेर स्पॅनिश जहाजांनी शरणागती पत्करली आणि जहाजावर आणलेले सोनेनाणे, चांदीची पोती, खाण्यापिण्याचा, धान्याचा साठा सर्व काही त्याच्या स्वाधीन केले. आपल्या जहाजावर जेवढे सामान हलवता येईल तेवढे हलवून ड्रेकचे जहाज झटकन पुढच्या प्रवासाला निघाले. स्पॅनिश जहाजाचे नाव होते ' काकाफ्यूगो '. या लुटीने फ्रॅन्सिस ड्रेक आणि त्याचे खलाशी कमालीचे श्रीमंत झाले. सोने-चांदी त्यांच्या हाती लागलीच. या शिवाय स्पॅनिश जहाजांनी वसाहती स्थापण्यासाठी घेतलेले गडगंज कोठार– कपडालत्ता, हिरे-माणके-अन्नधान्य ड्रेकच्या लोकांना मिळाले.

आता पुढच्या प्रवासाचा टप्पा चालू असताना ड्रेकने आपल्या जहाजाचे– ' पेलिकन 'चे नाव बदलून टाकले आणि ' गोल्डन हाईंड ' हे नाव घेतले. चिली, मेक्सिको येथील एका बंदरावर त्याने तळ ठोकला. त्या बंदरातील रानटी लोकांशी त्याने मैत्री केली. त्यांना कापड वाटले. जवळचे जिन्नस दिले. अत्तराच्या बाटल्या, काचेचे मणी, चामड्याच्या चपला-बूट-पट्टे वगैरे गोष्टी त्याने त्या लोकांना बक्षीस म्हणून वाटल्या.

हे करता करता तो आपल्या मित्राला जॉनला म्हणाला, " जॉन, आता यापुढे चाचेगिरी खरोखरी बंद करायची."

जॉन गालातल्या गालात हसला. परंतु ड्रेक मात्र जहाजाच्या डेकवर उभा राहून अत्यंत गंभीरपणे जॉनला सांगत होता. जॉनला ड्रेकचे बोलणे खरे वाटतच नव्हते. तो ड्रेकला म्हणाला, " मित्रा, मला या प्रकाराचा तिटकारा यायला लागलाय. हा चाचेगिरीचा आपल्यावरील कलंक धुवून काढायला हवा.... "

" कसा धुणार ! तो काय कोळशाचा डाग आहे का ? हाताने पुसली की झाले ? " जॉन त्याला हसतच म्हणाला. परंतु ड्रेकचे जॉनकडे लक्षच

नव्हते. शिकवलेल्या कबुतरांचे पिंजरे हातात घेऊन ड्रेक एकेक कबूतर मावळतीच्या रोखाने सोडून देत होता. आणि समोर लाल-तांबूस रंगाने माखलेल्या काळ्याशार ढगांकडे एकेक कबूतर उडून जात होते. या प्रत्येक कबुतराच्या पायात ड्रेकने कागदाचे चिटोरे अडकवलेले होते. त्यावर त्याने लिहिले होते : ड्रेक आणि त्याच्या सहकाऱ्यांनी आज अर्धी पृथ्वीप्रदक्षिणा पुरी केली.

कबूतरे दूरवर उडत जाताना ड्रेकच्या मनात विचार उचंबळत होते— एलिझाबेथ राणीला कबूतरांकडून संदेश मिळाला की काय वाटेल ? तिला आनंद होईल की एका लूटमार करणाऱ्याने धाडस दाखवले असे ती म्हणेल !

कॅबिनमधला नकाशा बाहेर काढून ड्रेक पहात होता. मॅगेलनने जसा प्रवास केला तसाच प्रवास आज त्यानेही केलेला होता. आता यापुढे मॅगेलन मसाल्याच्या बेटांकडे गेला होता. आपणही आता न्यूगिनी जवळच्या बेटांपाशी आलोय. इथेच कुठे तरी ऑस्ट्रेलिया खंड असावे असा संदेश राणीने धाडला होता. हा संदेश एका छोट्या नकाशातून सोन्याच्या पेटीमधून ड्रेकला मिळाला होता. प्रवासाला निघताना ज्या होडीची तो आतुरतेने वाट पहात होता त्याच होडीतून सोन्याच्या विटा आणि टेरा ऑस्टेलियाचा नकाशा आलेला होता.

जॉन ड्रेकला म्हणाला, "मला खरे वाटत नाही टेरा ऑस्टेलिया असा एखादा प्रदेश या पृथ्वीवर असेल."

"माझा विश्वास आहे," ड्रेक म्हणाला आणि नकाशाचे हे छोटे चिटोरे त्याने मोठ्या नकाशावर ठेवत म्हटले "आपण इथे या अक्षांशाजवळ आत्ता आहोत. ही न्यूगिनी बेटे. हे मोल्यूकोज....''

...सहज ड्रेकने बाहेर पाहिले.

बाहेरचा समुद्र एकदम काळपट दिसत होता. सभोवती आता काळपट पाणीच वाहतेय असे वाटत होते.

...ड्रेक आता खरोखरच स्वभावाने बदलला होता. पूर्वीचा त्याचा संतापी–तापट स्वभाव बदलून गेला. मॅगेलनप्रमाणे आपणही जवळ जवळ पूर्ण पथ्वीप्रदक्षिणा करणार आहो. पण आपल्या नशिबी पुन्हा प्लॅयमाऊथ बंदरावर गेल्यावर काय येणार–

– त्याचे लक्ष जहाजावरील काळ्या गुलामांकडे गेले. अनेक गुलाम त्याने पकडून ठेवले होते. नव्या अनोख्या प्रदेशातले हे लोक म्हणजे आपण या प्रदेशाकडे गेलो याचा जातिवंत पुरावा आहे. राणीला द्यायला हस्तिदंताचा ढीग आपण जमा केला. जहाज अडकले तरी सोने-नाणी खाली केले, जहाजातून पाण्यात टाकले पण हा अमूल्य ठेवा जपला. तऱ्हे-तऱ्हेच्या विचित्र वस्तू, नव्या प्राण्यांची कातडी, पक्ष्यांची पिसे, मसाल्याच्या बेटातून आणलेल्या लवंगा....पण इतके करून राणी आपल्याला चोरटा-भामटा तर समजणार नाही ना ?

'– मी भामटा असो कुणीही असो. आता समुद्रावर इंग्लंडचाही दरारा सुरू होतोय' ड्रेक स्वतःशी बडबडत असताना त्याचा मित्र जॉन तिथे आला आणि म्हणाला "कप्तान साहेब, खलाशी खाली आनंदोत्सव करतायत. गाणी गातायत. दारू ढोसतायत, नाचतायत....'

"का, कारण तरी काय ?" ड्रेकने सहजगत्या विचारले.

"अरे, काय म्हणजे काय ? आता आपण आपल्या इंग्लंडकडे जातोय. मायदेशी जातोय. जो तो खूष झालाय. आता त्यांना त्यांच्या बायका मुलात रमता येईल..."

ड्रेक मात्र गंभीरपणे पहात होता. त्याच्या मनात अजूनही कल्लोळ उचंबळलेला होता. आपले भवितव्य काय होणार ? याच विचाराने तो कासावीस झाला होता. ड्रेक अस्वस्थपणे जहाजावर वावरत होता पण जहाज मात्र संथपणे आपला मार्ग आक्रमत ॲटलांटिक महासागरातून हळूहळू इंग्लंडच्या रोखाने जात होते.

दुपारच्या वेळी लख्ख उन्हात ड्रेकचे जहाज प्लॅयमाऊथ बंदरात शिरले.

त्याच्या आगमनाची वार्ता हाहा म्हणता वणव्यासारखी कानाकोपऱ्यात पसरली. बंदरावर ड्रेकला पाहण्यास गर्दी उसळली. म्हातारे कोतारे म्हणत होते ' या ड्रेकला तुरुंगात डांबायला हवे. याने इंग्लंडच्या कीर्तीला काळिमा फासला. स्पेन आणि इंग्लंड यांच्यात हा वितुष्ट निर्माण करीत आहे ! ' तर तरुण रक्ताला हे विचार पसंत नव्हते. त्यांना ' ड्रेक ' हा एक फार मोठा नायक वाटत होता. स्पेनच्या आरमाराला शह कोण देऊ शकेल तर—ड्रेकच देऊ शकेल ! फक्त ड्रेक, ड्रेक, ड्रेक....

दस्तुरखुद्द राणी सरकार ड्रेकच्या समुद्र चाचेगिरीचा शहानिशा करण्याचा दिवस उजाडला. तो एक मोठा सोहळाच झाला. एका भल्या मोठ्या अलिशान सभागृहात ड्रेक आणि त्याचे खलाशी यांना आणण्यात आले. राणी सरकार मध्यभागी बसलेल्या होत्या आणि त्यांच्या दोन्ही बाजूला मंत्रिमंडळातील सरकारी, प्रतिष्ठित लोक, परदेशी वकीलातीचे लोक खुर्चीवर बसले होते. राणी सरकारांच्या अगदी शेजारच्या खुर्चीत रोमच्या चर्चचे इंग्लंडमधले मुख्य प्रतिनिधी धर्मगुरु बसलेले होते.

स्पेनचे वकील म्हणून काम पाहणाऱ्या वद्ध माणसाने प्रथम गंभीरपणे ड्रेकवरचे आरोप वाचून दाखवले. या आरोपात ड्रेकने स्पेनचे जहाज ' काकाफ्यूगो ' बुडवले होते त्याबद्दलचा तीव्र संताप होता. इतर अनेक जहाजांवर ड्रेकने चढवलेल्या हल्ल्यांचा उल्लेख होता आणि सौम्य शब्दात स्पेन—इंग्लंड यांचे मैत्रीचे संबंध ड्रेकमुळे संपुष्टात येतायत याचा इशाराही होता.

स्पेनच्या वकीलाच्या भाषणानंतर इतर अनेक उमरावांची भाषणे झाली. ड्रेकने कोणत्या भू-प्रदेशावर पाय रोवले याचा उल्लेख कुणाच्याच तोंडून निघत नव्हता.

" तुला तुझी बाजू मांडायची आहे का ? " सौम्य आवाजात एलिझाबेथ राणी सरकारांनी म्हटले. ड्रेक पुढे झाला. त्याने प्रथम राणीसाहेबांना नम्रपणे अभिवादन केले आणि म्हटले, " मला स्वतःची अशी बाजू नाही.

इंग्लंडमधले तरुण रक्त हीच माझी बाजू !" त्याच्या या शब्दासरशी राणी गहिवरून आली.

स्पेनचे वकील राणीसाहेबांकडे पाहू लागले, तोच राणीसरकारच्या पायावर ड्रेकने नम्रपणे आपले डोके टेकवले आणि म्हटले, " आपण जी शिक्षा द्याल ती भोगायला मी तयार आहे."

राणी सरकारांनी एक हात पुढे केला. शेजारच्या शिपायाने रत्नजडीत म्यानातून तलवार बाहेर काढली आणि ती लखलखीत तलवार राणीच्या हाती दिली. ते पाहून ड्रेकने मान खाली लववून राणी सरकारचे पाय धरले.

तलवारीच्या पात्याने चुटपुटता स्पर्श करीत एलिझाबेथ राणी खड्या आवाजात म्हणाली, " उठा, एराईस— सर फ्रॅन्सिस ड्रेक. आजपासून तुम्हाला ' सर ' हा सर्वोच्च किताब देण्यात येत आहे. उठा आणि समुद्रावर इंग्लंडचा झेंडा जगभर फडकाविण्यासाठी निघा ! "

—राणीच्या शब्दासरशी बँड वाजू लागला. ड्रेकच्या नावाचा जयजयकार चौफेर घुमू लागला. बंदरावरती उभे असणारे ड्रेकचे जीर्ण आणि खिळखिळे झालेले ' पेलिकन ' उर्फ ' गोल्डन हाईंड ' जहाजही उचंबळून येणाऱ्या भरतीच्या लाटांवर खाली-वर, वर खाली डुलू लागले होते.

❋ ❋

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. 9830 दिनांक ४।१२।८५
विषय बा. वा.

BVBK-0401830

## सुपर्ण प्रकाशन
## प्रकाशित कुमार-साहित्य

**जावईबापूंच्या गोष्टी**

—द. मा. मिरासदार

**चकवणारी कोडी**

—सुरेश मथुरे

**तुफान ( अद्‌भुतरम्य कादंबरी )**

—हेमंत जोशी

**चंडांशू आणि सुवर्णगरुड**
**( अद्‌भुतरम्य कादंबरी )**

—हेमंत जोशी

**चित्रगुप्त ( कादंबरी )**

—अरविंद कुलकर्णी